नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

संपादकीय ....

उपनिषदथर्‌व्याख्या : ४ कठोपनिषद – डॉ. के.ल. उफर्‌ भाऊजी दफ्तरी ....

मराठी वाङ्मयावर भागवत संप्रदायाचा परिणाम – डॉ. वा.ना. पंडित ....

मध्यप्रांताच्या इतिहासाची साधने – शं.गों. चट्ठे ....

‘प्रवाह’ अन ‘इशारा’ – द.रा. गोमकाळे ....

कविता ....

क्षेमा – कु. पुष्पा कानडे ....

संघवार्ता ....

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :

संपादकीय

युगवाणीचें संपादकत्व माझ्याकडे आल्यावर पहिल्या अंका-शिवाय आम्ही संपादकीय लिहिलें नाही, हा प्रकार कांही विपरीतसा वाटणें साहजिक आहे; पण संपादक म्हणून विशेष कांही सांगण्याचा अधिकार आम्हांपैकी कोणासच फारसा नाही असा आमचा समज आहे. पण आम्हीं संपादनाच्या धोरणामध्ये जें परिवर्तन केलें आहे त्याबद्दल थोडासा खुलासा करणें इष्ट होईल असें आम्हांला वाटल्याने मीं आज थोडेसें लिहावयाचें ठरविलें आहे.

युगवाणींतून ललित म्हणविणाऱ्या वाङ्मयाचा संक्षेप झाला आहे ही गोष्ट सहज ध्यानांत येण्याजोगी आहे आणि संशोधनपर गंभीर स्वरूपाच्या लेखांची संख्या वाढली आहे. त्यामुळे युगवाणी वाचनीय राहिली नाही असा एक आक्षेप आहे. ह्या आक्षेपांत तथ्य आहे. पण ललित वाङ्मयाला भरपूर जागा देणारीं अनेक मासिकें [illegible] युगवाणी बाजारांतलें मासिक नाही. तें एका

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या	डॉ. भाऊजी दफ्तरी
मराठी वाङ्मयावर भागवत संप्रदायाचा परिणाम	डॉ. वा. ना. पंडित
मध्यप्रान्ताच्या इतिहासाचीं साधनें	शंकर गोविंद चट्टे
'प्रवाह' अन् 'इशारा'	द. रा. गोमकाळे
समित्या अन् उपसमित्या	गो. स. कामत
क्षेमा	कु. पुष्पा कानडे
संघवार्ता	

डॉ. भाऊजी दफ्तरी स्मृति संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष १०
अंक ५

संपादक
दि. ब. पंडित

ऑगस्ट १९५९
किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :
डॉ. ना. के. महाजन
श्री. तु. ना. काटकर
प्रा. म. अ. चान्सरकर
श्री. मा. नी. गलगलीकर
श्री. रा. ना. घाटोळे

वर्ष १० वें अंक ५ वा

ऑगस्ट १९५५

संपादकीय

युगवाणीचें संपादकत्व माझ्याकडे आल्यावर पहिल्या अंका-शिवाय आम्ही संपादकीय लिहिलें नाही, हा प्रकार कांही विपरीतसा वाटणें साहजिक आहे; पण संपादक म्हणून विशेष कांही सांगण्याचा अधिकार आम्हांपैकी कोणासच फारसा नाही असा आमचा समज आहे. पण आम्ही संपादनाच्या धोरणामध्ये जें परिवर्तन केलें आहे त्याबद्दल थोडासा खुलासा करणें इष्ट होईल असें आम्हांला वाटल्याने मीं आज थोडेसें लिहावयाचें ठरविलें आहे.

युगवाणींतून ललित म्हणविणाऱ्या वाङ्मयाचा संक्षेप झाला आहे ही गोष्ट सहज ध्यानांत येण्याजोगी आहे आणि संशोधनपर गंभीर स्वरूपाच्या लेखांची संख्या वाढली आहे. त्यामुळे युगवाणी वाचनीय राहिली नाही असा एक आक्षेप आहे. ह्या आक्षेपांत तथ्य आहे. पण ललित वाङ्मयाला भरपूर जागा देणारीं अनेक मासिकें बाजारांत आहेत. युगवाणी बाजारांतलें मासिक नाही. तें एका साहित्य संस्थेचें मुखपत्र आहे. आणि वाचून हातावेगळी होणारी लघुकथा किंवा न वाचतांच दृष्टिआड होणारी कविता ह्यांना दीर्घ-जीवन नसल्याने साहित्यमूल्य फार कमी असतें. साहित्य संघाच्या मुखपत्राचा अंक कांही काळानंतर एखाद्या जिज्ञासू किंवा अभ्यासू वाचकाला मोलाचा वाटला तर तें मुखपत्र मोलाचें ठरेल. नवीन धोरणाबद्दल संपादकमंडळाचें कांहींनी अभिनंदनहि केलें आहे. ह्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहांत.

आम्हाला लेखनसाहाय्य करणाऱ्या सुहृदांना याच वेळीं कांही सूचना करणें सोईचें आहे. ललितलेखकांनी आपलें लिखाण पाठविण्या-पूर्वी त्याच्या उत्कृष्टपणाबद्दल स्वतःच स्वतःला ग्वाही देऊन मग तें आम्हाकडे पाठवावें. त्यामुळें निदान डाकव्यय तरी वाचेल. त्याच-प्रमाणें युगवाणीचा ज्याच्याशीं दूरान्वयानेहि संबंध नाही असा वाद निर्माण करणारीं किंवा वाद वाढविणारीं पत्रेंहि युगवाणीकडे येऊं नयेत. वाद आणि तंटा ह्यांतील भेदहि लक्षांत घेण्याजोगा आहे. आमच्या एतत्संबंधी निर्णयाचा कोणास राग येणें शक्य आहे. संपादक मंडळाने निर्णय घेतल्यावर स्नेह म्हणूनहि त्यांत विक्षेप करणें इष्ट होणार नाही. शिवाय अशीं पत्रें संपादकमंडळापैकी कोणाला व्यक्तिशः उद्देशून नसावींत. कारण कोणाचाहि व्यक्तिगत खाजगी उल्लेख युगवाणीला साजून दिसणार नाही. विदर्भ साहित्य संघाच्या प्रति-ष्ठेला न्यूनता न येईल अशी दक्षता घेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कठोपनिषद्

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दफ्तरी

वल्ली १ श्लोक २०-२२

येयं प्रेते विचिकित्सा मनुष्ये ।
अस्तीत्येके नायमस्तीति चान्ये ॥
एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाहम् ।
वराणामेष वरस्तृतीयः ॥२०॥

देवैरत्रापिविचिकित्सितं पुरा ।
न हि सुविज्ञेयमणुरेषधर्मः ॥
अन्यं वरं नचिकेतो वृणीष्व ।
मामोपरोत्सीरति मा सृजैनम् ॥२१॥

देवैरत्रापि विचिकित्सितं किल ।
त्वं च मृत्यो यन्न सुविज्ञेयमात्थ ॥
वक्ता चास्य त्वादृगन्यो न लभ्यः ।
नान्योवरस्तुल्य एतस्य कश्चित् ॥२२॥

अर्थः--नचिकेत म्हणाला, "मनुष्य मेल्यानंतरहि तो असतो असें कोणी म्हणतात आणि तो नाहीसाच होतो [नायमस्ति] असें कोणी म्हणतात, हा जो मेलेल्या मनुष्याविषयीं [प्रेते] संशय [विचिकित्सा] आहे, त्या संशयाचें निराकरण [एतत्] तुझ्या शिकवणीवरून [त्वया अनुशिष्टः] मी जाणावें, [विद्याम्] हाच तीन वरांपैकी तिसरा वर होय." ॥२०॥ यम म्हणाला, "पूर्वीच्या काळीं देवांना म्हणजे शहाण्यांना देखील ह्याविषयी संशयच होता. हा धर्म सूक्ष्म [अणु] असल्यामुळे ह्या संशयाचें निराकरण जाणणें सोपें नाही [न हि सुविज्ञेयम्] म्हणून हे नचिकेता, दुसरा वर माग. मला अडवूं नकोस. हा वर मला [मा] सोडून दे [अति सृज]. ॥२१॥ नचिकेत म्हणाला, "हे यमा, देवांना देखील ह्याविषयी संशय होता ही गोष्ट प्रसिद्ध आहे [किल] आणि हें समजणें सोपें नाही असें तूंच म्हणतोस आणि ह्या संशयाचें निराकरण सांगणारा [अस्य वक्ता] तुझ्यासारखा दुसरा मिळणार नाही. अर्थात् ह्या वराच्या बरोबरीचा [तुल्य] असा दुसरा कोणताच वर नाही." (म्हणून हाच वर तूं मला दे असा भाव आहे.) ॥२२॥

वल्ली १ श्लोक २३-२५

शतायुषः पुत्रपौत्रान् वृणीष्व ।
बहून् पशून् हस्तिहिरण्यमश्वान् ॥
भूमेर्महदायतनं वृणीष्व ।
स्वयं च जीव शरदो यावदिच्छसि ॥२३॥

एतत्तुल्यं यदि मन्यसे वरम् ।
वृणीष्व वित्तं चिरंजीविकां च ॥
महाभूमौ नचिकेतस्त्वमेधि ।
कामानां त्वां कामभाजं करोमि ॥२४॥

ये ये कामा दुर्लभा मर्त्यलोके ।
सर्वान् कामांश्छंदतः प्रार्थयस्व ॥
इमाः रामाः सरथाः सतूर्याः ।
नहीदृशा लंभनीया मनुष्यैः ॥
आभिर्मत्प्रत्ताभिः परिचारयस्व ।
नचिकेतोमरणं मानुप्राक्षीः ॥२५॥

अर्थः—यम म्हणाला, "अरे शंभर वर्षे जगणारे पुत्र माग, नातू माग, पुष्कळ पशू माग, हत्तीघोडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माग, सोनें माग, पृथ्वीवरील मोठें राज्य [आयतनम्] माग आणि स्वतः तुझी इच्छा असेल तितकी वर्षे जिवंत रहा. ॥ २३॥ जर तो वर ह्यांच्या बरोबरीचा आहे असें तुला वाटत असेल तर तूं धन माग आणि दीर्घायुष्य [चिरजीविकाम्] माग. तूं मोठ्या भूमीवर अस [एधि] म्हणजे राज्य कर. तुला सर्व काम प्राप्त होतील असें मी करतों. ॥२४॥ जे जे काम मर्त्यलोकीं दुर्लभ आहेत ते ते सर्व तूं तुझ्या मनास येतील तितके [छंदतः] मागून घे [प्रार्थयस्व]. ह्या रथावर बसणाऱ्या [सरथाः] व वाद्य धारण करणाऱ्या [सतूर्याः] रमणीय स्त्रिया [रामाः] तूं मागून घे. अशा स्त्रिया मनुष्यांस मिळूं शकत नाहीत [न लंभनीयाः] मी दिलेल्या ह्या स्त्रियांकडून तूं आपली सेवा करून घे [परिचारयस्व]. परंतु हे, नचिकेता मरणाविषयी तूं मला प्रश्न विचारूं नकोस. ॥२५॥

टिपणें—"चिरजीविकाम्":-यमाने चिरजीविका म्हणजे दीर्घायुष्यच मागण्यास सांगितलें ह्यावरून यम मरणराहित्य देऊं शकत नाही, किंवा दुसऱ्या वरामध्ये सांगितलेल्या अग्नीच्या उपासनेनेहि प्राप्त होऊं शकत नाही असेंच सूचित होतें म्हणून "न तत्रत्वं" ह्या मागील श्लोक बारामधील वाक्यांत "स्वर्गांत अकालमृत्यु नाही" असाच अर्थ घेतला पाहिजे. ह्यामुळेच "जन्ममृत्यु" ह्या सतराव्या श्लोकांतील शब्दांतहि "दोन प्रकारचे अकालमृत्यु" असा अर्थ घ्यावा लागतो; कारण हेच कर्मांनी तरतां येतात.

मर्त्यलोकः— स्वर्गाच्या म्हणजेच सामाजिक सुस्थितीच्या उलट अशी जी अवस्था ती. सामाजिक सुस्थितीशिवाय चांगल्या स्त्रियाहि उपभोगास मिळूं शकत नाहीत; कारण तशा स्थितींत त्यांना आरोग्यकारक व सौंदर्यवर्धक पोषण आणि उत्तम शिक्षण हीं मिळू शकत नाहीत.

"एधि" हें अस् धातूचें आज्ञार्थाचें (लोटाचें) मध्यम पुरुषाचें एक वचन आहे.

वल्ली १ श्लोक २६—२९

श्वोभावा मर्त्यस्य यदंतकैतत् ।
सर्वेंद्रियाणां जरयंति तेजः ॥
अपि सर्वं जीवितमल्पमेव ।
तवैव वाहास्तव नृत्यगीते ॥ २६ ॥

न वित्तेन तर्पणीयो मनुष्यः ।
लप्स्यामहे वित्तमद्राक्ष्म चेत्त्वा ॥
जीविष्यामो यावदीशिष्यसित्वम् ।
वरस्तु मे वरणीयः स एव ॥२७॥

अजीर्यताममृतानामुपेत्य ।
जीयन् मर्त्यः क्वधःस्थः प्रजानन् ।
अभिध्यायन् वर्णरतिप्रमोदान् ।
अतिदीर्घे जीविते को रमेत ॥२८॥

यस्मिन्निदं विचिकित्संतिमृत्यो ।
यत्सांपराये महति ब्रूहि नस्तत् ॥
योऽयं वरो गूढमनुप्रविष्टः ।
नान्यं तस्मान्नचिकेता वृणीते ॥२९॥

अर्थः—नचिकेत म्हणाला, "हे मृत्यो [अंतक] ज्या उपभोगांचें प्रलोभन त्वां मला दाखविलेंस ते मर्त्यांचे उपभोग उद्या राहणार नाहीत [श्वोभावाः । श्वः अभावो येषां ते]; कारण ते उपभोग सर्व इंद्रियांचें हें तेज [एतत् तेजः] म्हणजे उपभोगसामर्थ्य क्षीण करतात. [जरयंति] आणि पूर्ण [सर्वं] आयुष्य [जीवितम्] देखील [अपि] थोडेंच आहे. म्हणून तुझे घोडे, नृत्य आणि गीत तुझेंच असूं दे [संतु हें अध्याहृत क्रियापद] म्हणजे मला देऊं नकोस. ॥२६॥ वित्ताने म्हणजे धनाने मनुष्याची तृप्ति होत नाही. आणि तें वित्तहि आम्ही तुला ज्या अर्थी पाहिलें म्हणजे तुला पाहून तुझ्यापासून कर्मरूपी अग्नीची उपासना शिकलों त्या अर्थी त्या उपासनेनें आम्हांस मिळेलच. तें वराने पुनः मागण्याची गरज नाही. आयुष्यहि मागण्याची गरज नाही, कारण तूं जेव्हा आम्हांस आपल्या काबूंत घेशील म्हणजे मारशील [ईशिष्यसि] तोंपर्यंत आम्ही जिवंत राहणारच आहोंत. म्हणून मी तोच वर मागतों. ॥ २७ ॥ तुझ्यासारख्या न मरणाऱ्या [अमृतानां] व जरारहित [अजीर्यताम्] देवाजवळ आल्यानंतर [उपेत्य । "समीपम्" हें पद अध्याहृत

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानून "समीपमुपेत्य" अशी रचना करावी व अर्थ करावा] म्हणजे त्यांच्याजवळून श्रेष्ठ प्रकारचें ज्ञान मिळविणें शक्य असतां ह्या पृथ्वीवर खाली राहणारा [क्वधःस्थः] जरामरणयुक्त [जीर्यन् मर्त्यः] व गीतरति-पासून म्हणजे गाणें व स्त्रियांचा उपभोग ह्यापासून होणारे आनंद [वर्णरतिप्रमोदान्] नश्वर आहेत असा विचार करणारा [अभिध्यायन्] कोणता जाणता मनुष्य दीर्घजीवितांतच आनंद मानील ? ॥२८॥ ज्या विषयीं [यस्मिन्] हा संशय घेतात [इदं विचिकित्संति] आणि जें मोठ्या भविष्यकाळांत [सांपराये] म्हणजे मृत्यूनंतरच्या काळांत आहे, तें, हे मृत्यो आम्हांस सांग. हा जो गूढ विषयासंबंधीचा [अनुप्रविष्टः] वर आहे त्याहून भिन्न वर नचिकेत मागत नाही. ॥२९॥

टिप्पणें:—"सर्व":—छांदोग्यांत, २। ११-२० येथे आणि ४। ११-१३ येथे सर्वमायुः हे शब्द वारंवार आले आहेत. तेथे 'सर्व' ह्याचा अर्थ 'पूर्ण' असाच अर्थ आहे. तदनुसारच येथेहि 'सर्व' ह्याचा पूर्ण असा अर्थ केला आहे.

क्वधःस्थः—कुःएव अधः क्वधः। तत्र तिष्ठति सः क्वधःस्थः।; 'क्व तदास्थः' असाहि दुसरा पाठ आहे असें श्री. शंकराचार्य म्हणतात आणि 'कः तदास्थः' ह्यांचा जो अर्थ होईल तसा त्या पाठाचा अर्थ ते श्लोका-च्या पूर्वार्धाचें निराळें वाक्य मानून करतात.

'अभिध्यायन्' म्हणजे 'विचार करणारा' असा अर्थ आम्ही केला आहे. श्री शंकराचार्यांनीहि असाच म्हणजे "अनवास्थितरूपतया निरूपयन्" असा केला आहे. हाच अर्थ पुढे वल्ली दोन श्लोक ३ येथे जुळतो. प्रश्नोपनिषदांत पांचव्या प्रश्नांतहि 'अभिध्यै' ह्या धातूचा असाच अर्थ आहे.

'वर्णरतिप्रमोदान्' ह्यांतील 'वर्ण' ह्याचा, अर्थ मूळचा अकारादि अक्षरें असा आहे. गायनांत अर्थ निरपेक्ष अकारादि अक्षरेंच आनंद देतात म्हणून 'वर्ण' ह्याचा अर्थ गायन असा केला आहे. श्री गोपालयतींद्र-टीकेंतहि हाच अर्थ केला आहे.

"सांपराये" सं परायते म्हणजे जोराने पळतो म्हणजेच जोराने पळून जो वर्तमानकाळ व भूतकाळ बनतो तो भविष्य काळ असा मूळचा अर्थ असला पाहिजे. त्यावरूनच मृत्यूनंतरचा काळ असा अर्थ निघाला व तोच अर्थ येथे आहे. हा शब्द पुनः वल्ली २ श्लोक ६ येथे आला आहे. येथे त्याचा अर्थ भविष्यकाळ असाच आहे.

वल्ली दुसरी

वल्ली २ श्लोक १-६

अन्यच्छ्रेयोन्यदुतैव प्रेयः।
ते उभे नानार्थे पुरुषं सिनीतः॥
तयोः श्रेयआददानस्य साधु भवति।
हीयतेऽर्थाद्य उ प्रेयो वृणीते ॥ १

श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतः।
तौ संपरीत्य विविनक्ति धीरः॥
श्रेयो हि धीरोऽभिप्रेयसो वृणीते।
प्रेयो मंदोऽयोगक्षेमाद् वृणीते ॥ २ ॥

सत्वं प्रियान् प्रियरूपांश्च कामान्।
अभिध्यान्नचिकेतोत्यस्राक्षीः॥
नैतां सृंकां वित्तमयीमवाप्तः।
यस्यां मज्जंतिबहवो मनुष्याः ॥३॥

दूरमेते विपरीते विषूची।
अविद्या याच विद्येति ज्ञाता॥
विद्याभीप्सिनं नचिकेतसं मन्ये।
न त्वा कामा बहवो लोलुपंतः ॥४॥

अविद्यायामंतरे वर्तमानाः।
स्वयंधीराः पंडितं मन्यमानाः॥
दंद्रम्यमानाः परियंति मूढाः।
अंधेनैव नीयमाना यथांधाः ॥५॥

न सांपरायः प्रतिभाति बालं।
प्रमाद्यंतं वित्तमोहेन मूढम्॥
अयं लोको नास्ति पर इति मानी।
पुनः पुनर्वशमापद्यते मे ॥६॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्थः—यम म्हणाला, "श्रेयस् म्हणजे हितकर हें प्रियाहून भिन्न [अन्यत्] असतें आणि प्रिय [प्रेयस्] हें श्रेयसाहून भिन्न असतें म्हणजे हितकर असतें तें प्रिय नसतें आणि प्रिय असतें तें हितकर नसतें. त्यांचीं फळेंहि भिन्न आहेत. [नानार्थे] ते दोनहि मनुष्यावर आपले पाश टाकतात म्हणजे मनुष्यास आपल्या आपल्याकडे ओढतात [सीनीतः] अशा वेळीं जो श्रेयाचा स्वीकार करतो त्याचें कल्याण होतें. परंतु जो प्रेयाची निवड करतो [वृणीते] त्याच्या कल्याणाची हानी होते [अर्थात् हीयते] म्हणजे त्याला कल्याण प्राप्त होत नाही. ॥१॥ श्रेयस आणि प्रेयस हे दोनहि मनुष्याकडे येतात. तेव्हां शहाणा मनुष्य [धीरः] त्यांचें परीक्षण करून [संपरीत्य] त्यांमधील फरक पाहतो [विविनक्ति] आणि प्रेयसापेक्षा श्रेयसच पसंत करतो [अभिवृणीते] म्हणजे निवडतो. पण मंदबुद्धीचा मनुष्य शरीराची शक्ति वगैरे मिळविणें [योग] आणि त्याचें रक्षण करणें [क्षेम] ह्याकरितां काय केलें पाहिजे ह्याचा विचार न करितां [अयोगक्षेमात्] प्रेयसच पसंत करतो ॥२॥ त्या त्वां [कृत्वं] म्हणजे त्याला कामांचा लोभ मी दाखविला त्या, त्वां प्रिय आणि प्रियासारखेच दिसणारे [प्रिय-रूपान्] जे काम त्यांचा विचार करून [अभिध्यायन्] हे नचिकेता, त्याग केलास [अत्यास्राक्षीः]. जीमध्ये पुष्कळ मनुष्य बुडतात अशी ही चालू क्षणीं होणाऱ्या विषयसुखांची बनलेली [वित्तमयी] उपभोगपरंपरा [सृंका] त्वां स्वीकारली नाहीस [न अवाप्तः]. एकूण तुझी बुद्धि फार चांगली आणि सावध आहे असा भाव आहे. ॥३॥ जिला 'विद्या' असें म्हणतात [इति ज्ञाता] आणि जिला 'अविद्या' असें म्हणतात, ह्या दोन एकमेकींपासून दूर आहेत; त्यांचीं रूपेंहि एकमेकाच्या उलटीं आहेत [विपरीते], आणि त्यांचीं फळेंहि एकमेकांपासून भिन्न आहेत [विषूची]. नचिकेत हा 'विद्ये'ची इच्छा करणारा आहे असें मी मानतों. कारण हे नचिकेता, तुला हे पुष्कळ काम लोभवूं शकले नाहीत [लोलुपंतः]. ॥४॥ अविद्येमध्येच गुरफटून गेलेले [वर्तमानाः] स्वतालाच शहाणे आणि पंडित (म्हणजे शास्त्रग्रंथांचा अर्थ जाणणारे) मानणारे मूर्ख लोक [मूढाः], ज्यांचे वाट दाखविणारे आंधळेच आहेत अशा आंधळ्यांप्रमाणे, दांदरत [दंद्रम्यमानाः] म्हणजे ठेचा खात व पडतझडत फिरतच राहतात [परियंति] म्हणजे आपल्या मुक्कामास जाऊन पोचत नाहीत म्हणजे अनेक दुःखें भोगतात आणि आनंदावस्थेस प्राप्त होत नाहीत असा भाव आहे. ॥५॥ चालू क्षणीं प्राप्त होणाऱ्या सुखाच्या मोहाने [वित्तमोहेन] मूढ आणि चुकणाऱ्या मनुष्यास भविष्यत्काळ [सांपरायः] दिसत नाही [प्रतिभाति] म्हणजे त्या चालू क्षणाच्या सुखापासून (तात्कालिक सुखापासून) पुढच्या काळीं होणारें दुःख त्याला दिसत नाही. हीच चालू अवस्था [अयं लोकः] आहे आणि पुढील भविष्यत्काळची अवस्था [परः लोकः] नाही असें मानणारा मनुष्य पुनः पुनः माझ्या म्हणजेच अखेरचें मरण जवळ आणणाऱ्या दुःखाच्या कचाट्यांत सापडतो. (तावडींत सापडतो) म्हणजे दुःखी होतो हा भाव आहे. ॥६॥

टिप्पणें:—"अयोगक्षेमात्" इतरांनी 'योग-क्षेमात्' असाच पदच्छेद केला आहे; परंतु 'अयोग-क्षेमात्' असाहि पदच्छेद करतां येतो आणि ह्यानेच अधिक सरस अर्थ निघतो हें उघड आहे.

"वित्त"—इतरांनी वित्त म्हणजे धन असा अर्थ केला आहे. पण त्याने चांगला सरस व उपपन्न अर्थ निघत नाही म्हणून आम्ही 'वित्त' ह्याचा यौगिक अर्थ विचारांत घेऊन त्यावरून 'सांपराय' ह्याच्या विरुद्ध असा अर्थ घेतला आहे. कारण 'सांपराया' विरुद्ध असाच अर्थ 'वित्त' ह्या शब्दांत अभिप्रेत असणें संभवनीय आहे व त्यावरून प्राप्त होणाराच श्लोकार्थ उपपन्न आहे. इतर अर्थ उपपन्न नाहीत. धनापेक्षा चालू क्षणीं प्राप्त होणारें सुखच म्हणजेच तात्कालिक सुखच जास्त मोहक असतें म्हणून आमचा अर्थ जास्त उपपन्न आहे. शिवाय मृत्युनंतरच्या अवस्थे-विषयीं उपनिषदामध्ये जें केवळ कल्पनेने सांगितलें आहे त्याला अनुसरून अर्थ करण्यापेक्षा मृत्युपूर्वीदेखील जें प्रत्यक्ष दिसून येतें त्याला अनुसरून अर्थ करणें अधिक चांगलें म्हणूनहि 'सांपरायः' म्हणजे 'भविष्य-त्काळ' आणि 'वित्त' म्हणजे प्राप्त झालेले म्हणजे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चालू क्षणीं मिळणारें सुख असा अर्थ करणें योग्य आहे.

'अविद्या' म्हणजे विषयभोगप्राप्त्यर्थ करावयाचीं कर्में असा अर्थ आहे. अविद्येचें साध्य विषयभोगप्राप्ति असल्यामुळे येथे केलेली तिची निंदा योग्यच आहे. तथापि ती अजीबात टाकावी असा भाव नाही; कारण परिमित विषयभोगानेच दररोजचा मृत्यु टळतो. म्हणूनच 'अविद्यया मृत्युं तीर्त्वा' असें ईशोपनिषदांत म्हटलें आहे. 'अविद्या' आणि 'विद्या' ह्यांचा समुच्चय करावा असा भाव आहे. वेदोक्त यज्ञादिकर्मांचा अविद्येंतच अंतर्भाव होतो. कारण त्यांचेंहि प्राप्तव्य विषयोपभोग हेंच आहे. म्हणूनच यज्ञादि कर्मांची निंदा मुंडक १।२।७-११ येथे बहुतेक कठांतील शब्दांनीच आणि भगवद्गीतेंत 'यामिमां पुष्पितां वाचम्' इत्यादि श्लोकांत दुसऱ्या अध्यायांत केली आहे. यज्ञादि कर्मांनाच अग्नींधनादि कर्में असें व्याससूत्रांत म्हटलें आहे आणि तीं करणें किंवा न करणें हें काम्य आहे असें म्हटलें आहे. ३।४।२५—२६ वरील आमचें विवरण पहा.

"सिनीतः":—सि धातूचा अर्थ आपट्यांच्या कोशांत 'ensnare' म्हणजे पाशाने बांधणें असा दिला आहे. पाशाने बांधल्यानंतर ओढण्याची क्रिया होते म्हणून 'ओढतात' असा अर्थ आम्ही केला आहे.

वल्ली २ श्लोक ७-१३

श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्यः ।
शृण्वंतोऽपि बहवो यं न विद्युः ॥
आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धा ।
आश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः ॥७॥
न नरेणावरेणप्रोक्त एष ।
सुविज्ञेयो बहुधा चिंत्यमानः ॥
अनन्यप्रोक्ते गतिरत्र नास्ति ।
अणीयान् ह्यतर्क्यमणुप्रमाणात् ॥८॥
नैषा तर्केण मतिरापनेया ।
प्रोक्तान्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठ ॥
यां त्वमापः सत्यधृतिर्बतासि ।
त्वादृङ्नो भूयान्नचिकेतः प्रष्टा ॥९॥
जानाम्यहं शेवधिरित्यनित्यम् ।
नह्यध्रुवैः प्राप्यते हि ध्रुवं तत् ॥
ततो मया नाचिकेतश्चितोग्निः ।
अनित्यैर्द्रव्यैः प्राप्तवानस्मि नित्यम् ॥१०॥
कामस्याप्तिं जगतः प्रतिष्ठाम् ।
क्रतोरानन्त्यमभयस्य पारम् ॥
स्तोमं महदुरुगायं प्रतिष्ठाम् ।
दृष्ट्वा धृत्या धीरो नचिकेतोऽत्यस्राक्षीः ॥११॥
तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टम् ॥
गुहाहितम् गह्वरेष्ठं पुराणम् ॥
अध्यात्मयोगाधिगमेन देवम् ।
मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति ॥१२॥
एतच्छ्रुत्वा संपरिगृह्य मर्त्यः ।
प्रवृह्य धर्म्यमणुमेतमाप्य ॥
स मोदते मोदनीयं हि लब्ध्वा ।
विवृतं सद्म नचिकेतसम् मन्ये ॥१३॥

अर्थ—यम पुढे म्हणाला, "जो आत्मा पुष्कळांस ऐकण्यासहि मिळत नाही व ऐकण्यास मिळाला तरी ज्याचें ज्ञान पुष्कळांस होत नाही, त्याविषयीं कुशलपणें बोलणारा आश्चर्य आहे म्हणजे क्वचितच असतो. आणि कुशल मनुष्याने शिकविलें तरी [अनुशिष्टः] त्या आत्म्याला जाणणारा [ज्ञाता] व मिळविणारा [लब्धा] हि आश्चर्यच आहे म्हणजे क्वचितच असतो. ॥७॥ पुष्कळ प्रकारांनी ज्याचा विचार करावा लागतो, अशा ह्या आत्म्याचें वर्णन हलक्या मनुष्याने केलें असतां तो सोप्या किंवा चांगल्या रीतीने जाणला जात नाही. दुसऱ्याने वर्णन केल्याशिवाय (सामान्य बुद्धीच्या मनुष्यास) ह्याचें ज्ञान होत नाही; कारण अणुपेक्षाहि [अणुप्रमाणात्] लहान [अणीयान्] असलेल्या ह्या आत्म्याचें रूप तर्क करण्यास कठीण आहे. ॥८॥ जें हें ज्ञान [यां मतिं] आता तुला मजकडून मिळणार आहे [त्वं आपः] तें हें ज्ञान (सामान्य मनुष्यास) तर्काने मिळूं शकत नाही. हें अत्यंत आवडत्या नचिकेता, दुसऱ्याने अर्थात् श्रेष्ठ पुरुषाने सांगितलें

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तरच हें ज्ञान सहज आणि चांगलें होतें [सुज्ञानाय]. हे नचिकेता तूं खरोखरच [यत] सत्यनिष्ठ [सत्यधृतिः] आहेस. तुझ्यासारखा पुसणारा शिष्य आम्हास मिळावा. ।।९।। धन [शेवधि] अनित्य म्हणजे अध्रुव (चंचल) आहे हें मी जाणतों आणि अध्रुव वस्तूंनी तें ध्रुव आत्मतत्त्व प्राप्त होऊं शकत नाही हेंहि जाणतों. म्हणूनच मी नाचिकेत अग्नीची उपासना करून अध्रुव वस्तूंनी [अनित्यै द्रव्यैः] आवश्यक तेवढेंच [नित्यम्] म्हणजे आयुष्य म्हणजेच जिवंत राहणें आणि जागृतीची अवस्था एवढेंच मिळविलें, अधिक म्हणजे कामोपभोग मिळविण्याची हाव मी धरली नाही असा भाव आहे. अर्थात् मी तुझा गुरु होण्यास योग्य आहे. ।।१०।। (आणि तूं देखील माझा शिष्य होण्यास योग्य आहेस, कारण) हे नचिकेता, त्वां, (कामाची आप्ति म्हणजेच तृप्ति (२) जगाची म्हणजेच जगांतील वस्तूंची प्रतिष्ठा म्हणजे स्थिरता (३) जीवनाचें [क्रतोः] आनंत्य (४) अभयाचा म्हणजेच आनंदाचा पार म्हणजे पैल तीर (५) मोठ्या कीर्तीचें [उरुगायम्] आणि स्तुत्य [स्तोमं] असें पूर्णानंदरूपी मोठें पद [महत्] आणि त्याची प्रतिष्ठा म्हणजेच स्थिरता अथवा शाश्वती [प्रतिष्ठां] ह्या पांच गोष्टींचा धैर्यानें [धृत्या] विचार करून [दृष्ट्वा] शहाणपणाने [धीरः] कर्मांनी प्राप्त होणाऱ्या अनावश्यक विषयोपभोगांचा त्याग केलास. म्हणजे (१) कामाची तृप्ति उपभोगांनी कधीच होत नाही. (२) जगांतील वस्तु स्थिर नाहीत. (३) परंतु जीव अनंत असल्यामुळे त्याच्या अनंत काळच्या आनंदाची तरतूद केली पाहिजे (४) म्हणून आनंदाचें पर तीर पाहणें म्हणजेच आनंदाचें स्वरूप पूर्णपणें जाणून घेणें जरूर आहे (५) आणि जाणल्यानंतर तें पूर्णानंदाचें स्तुत्य, मोठ्या कीर्तीचें मोठें पद मिळविणें [प्रतिष्ठाम्] जरूर आहे असा विचार करून विषयोपभोगांचा त्वां त्याग केलास. ।।११।। गह्वरांत म्हणजे दुर्गम प्रदेशांमध्ये असल्यामुळे जाणण्यास कठीण [गह्वरेष्ठः], पुढे वल्ली ३ श्लोक १०-११ येथे वर्णिलेल्या गुहेंत ठेवलेला [गुहाहितं] वल्ली ६ श्लोक १७ येथे वर्णिल्याप्रमाणे गूढ अशा हृदयांत प्रवेश करून राहणारा [गूढमनुप्रविष्टः] जो देव (आत्मा, ब्रह्म) त्याचा जीवाशीं [अध्यात्म] त्याच्या (त्या देवाच्या) संयोगाची [योग] प्राप्ति होईपर्यंत, [अधिगमेन] विचार केल्याने [मत्वा] हर्ष आणि शोक ह्यांचा शहाणा मनुष्य [धीरः] त्याग करतो, म्हणजे हर्षशोकापासून मुक्त होतो. ॥ १२ ॥ हें आत्मज्ञान ऐकून व त्याचें चांगल्या रीतीने ग्रहण करून त्या ज्ञानाच्या साधनाने, धर्म्य म्हणजे धर्माचें साध्य जो आनंद त्यास देणाऱ्या, आत्म्यास, शरीरांतून वेगळें काढून [प्रवृह्य] म्हणजे शरीरापासून तो भिन्न आहे. असें जाणून, त्या सूक्ष्म आत्म्यास [एतं अणुं] मिळवून म्हणजे त्या आनंद देणाऱ्यास [मोदनीयं] मिळवून आनंद पावतो [मोदते]. नचिकेताकरिता त्या आनंदाचें घर उघडें झालें आहे असें मला वाटतें. ।।१३।।

टिप्पणें:—वल्ली ३ श्लोक १२ येथील "दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः" ह्या वचनांत आत्मा श्रेष्ठ बुद्धीने जाणला जातो हें स्पष्ट सांगितलें आहे आणि तें येथील कांही श्लोकांत जें सांगितलें आहे त्याशीं विरुद्ध आहे. म्हणून जैमिनीय सूत्र "शास्त्रदृष्ट विरोधाच्च" (१।२।२) प्रमाणे ह्या विरुद्ध वचनांपैकी कोणतें तरी एक स्तुत्यर्थक म्हणजे प्रसंशा म्हणजे फुगवून सांगितलेलें आहे असें मानणें भाग आहे. कोणतेंहि ज्ञान प्रथमतः बुद्धीनेच होतें, आणि दुसऱ्यास कोणतेंहि ज्ञान सांगणारा पहिला मनुष्यहि तें ज्ञान बुद्धीनेच जाणतो म्हणून येथील श्लोकांतील वचनेंच प्रसंशा आहेत, म्हणजे फुगवून सांगितलीं आहेत असें मानलें पाहिजे. सामान्य बुद्धीच्या मनुष्यास स्वताच्या बुद्धीने आत्म्याचें ज्ञान होत नाही हीच गोष्ट फुगवून "आत्मा अज्ञेय आहे," असें म्हटलें असलें पाहिजे, म्हणून आम्ही प्रशंसेचें स्वरूप काढून वर दिल्याप्रमाणे अर्थ केला आहे.

"अणुप्रमाणात्" येथील "प्रमाण" हा शब्द पुरावा (evidence, proof) ह्या अर्थाचा नाही; तो माप (measure) ह्या अर्थाचा आहे.

"नित्य" नित्य म्हणजे नेहमीं राहणारा, ध्रुव, असा एक अर्थ आहे आणि आवश्यक असाहि दुसरा अर्थ आहे (आपट्यांचा कोश पहा). हा दुसरा अर्थ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धर्मशास्त्रांत प्रसिद्ध आहे. दहाव्या श्लोकांत नित्य शब्द हा भिन्न ठिकाणीं ह्या दोन भिन्न अर्थांनी योजला आहे असें मानल्याशिवाय ह्या श्लोकांचा चांगला अर्थ लागत नाही.

"क्रतु" म्हणजे जीव हें ईशोपनिषदांतील श्लोक १७ च्या टिप्पणांत दाखविलें आहे. "स्तोमं महत् उरुगायं":—स्तोम म्हणजे स्तुत्य असा अर्थ श्री शंकराचार्य करतात. तदनुसार आम्हीहि केला आहे. पणं त्याचा कोणता तरी भिन्न अर्थ असावा असें वाटतें. आपट्यांच्या कोशाप्रमाणे हा शब्द विशेषण नसून नाम आहे. तो पुल्लिंग असेल तर त्याचे स्तुति, यज्ञ वगैरे अर्थ आणि नपुसकलिंगी असेल तर त्याचे डोकें धान्य वगैरे अर्थ दिले आहेत. त्यापैकी येथे एकहि जुळत नाही. "स्तोम" हा शब्द स्तु म्हणजे स्तुति करणें ह्या धातूपासून निघाला आहे व त्याचा यौगिक अर्थ कोणतीहि स्तुत्य गोष्ट असा होतो. धान्याप्रमाणेच किंबहुना अधिक, सुख हेंहि स्तुत्यच आहे तर मग 'स्तोम' ह्याचा सुख असाहि अर्थ असूं शकतो व तोच अर्थ येथे असेल असें वाटतें. तसें मानल्यास "स्तोमं महदुरुगायं" ह्यांचा अर्थ "ज्याची फार स्तुति करतात [उरुगायं] तो मोठा [महत्] आनंद" असा होईल हाहि अर्थ आम्ही वर केलेल्या अर्थाहून भिन्न नाही.

"अध्यात्मयोगाधिगमेन":—"अध्यात्मा" म्हणजे 'जीव' हाच अर्थ उपनिषदांमध्ये असतो हें निश्चित आहे. 'अथदैवं' 'अथाध्यात्मम्' असे प्रयोग उपनिषदांमध्ये वारंवार येतात. तेथे 'आत्मन्' शब्दाचा अर्थ 'शरीर' हाच सर्व मानतात. अर्थात् येथेहि 'अधि आत्मनि शरीरे तिष्ठति सः अध्यात्मा जीवः' असाच अर्थ असला पाहिजे. तसा अर्थ घेऊन 'अध्यात्मयोगाधिगमः' ह्या समासाचा अर्थ आम्ही केला आहे. त्याच्या तृतीयाविभक्तीचा अर्थ लक्षणं असा आम्ही मानला आहे. म्हणजे 'मत्वा' ह्यांतील मनन-क्रियेचें अध्यात्मयोगाधिगम हें लक्षण आहे असें मानलें आहे.

"ज्ञाता, लब्धा":—सातव्या श्लोकांत हे दोन शब्द आले आहेत, ह्यावरून ब्रह्मज्ञान आणि ब्रह्म-प्राप्ति ह्यांमध्ये उपनिषदें फरक मानतात असें दिसतें. ब्रह्मज्ञान म्हणजे ब्रह्माचे गुण जाणणें. ब्रह्मप्राप्ति म्हणजे ते ब्रह्माचे गुण वर्तनांत येणें. जसें ब्रह्म हें शोकरहित आहे हें जाणणें ज्ञान होय आणि तें शोकराहित्य वर्तनांत येणें ही ब्रह्मप्राप्ति. हिलाच बाराव्या श्लोकांतील "अध्यात्मयोगाधिगमेन" ह्या शब्दांत 'योग' म्हटलें आहे. व्याससूत्रें ४ । १ विशेषतः सूत्र १२ ह्यावरील आमचें विवरण पहा.

"हर्ष शोकौ":—ह्यांतील 'हर्ष' 'आनंदा'हून भिन्न आहे. 'हर्ष' हा परावलंबी म्हणजे बाह्य विषयप्राप्तीवर अवलंबून असतो. 'आनंद' हा बाह्य विषयप्राप्तीवर अवलंबून नसतो. ब्रह्मज्ञाच्या दृष्टीने जागृतींतील कोणतीहि शारीरदुःखरहित अवस्था 'आनंदच' होय. अनुकुलविषयप्राप्ति म्हणजे 'हर्ष'. प्रतिकूल विषयप्राप्ति 'दुःख' होय. खरोखर दुःख नसतांहि दुःख मानणें म्हणजेच 'शोक'. 'नचिकेतसम्' ही द्वितीया विभक्ति "प्रति" ह्या अध्याहृत अव्ययामुळे झालेली आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी वाङ्मयावर भागवत संप्रदायाचा परिणाम

डॉ. वा. ना. पंडित

मराठी वाङ्मयावर भागवत संप्रदायाचा परिणाम कोणता झाला हें पाहत असतांना प्रमुखतः आपल्याला प्राचीन मराठी वाङ्मयाचाच विचार करावा लागणार आहे. कारण अर्वाचीन वाङ्मयावर भागवत संप्रदाया-पेक्षा पाश्चात्य नवीन मतांचाच बहुतांशीं परिणाम झालेला आहे. नाही म्हणायला न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक इत्यादि विद्वानांनी लिहिलेल्या सुरुवातीच्या अर्वाचीन मराठी वाङ्मयावर भागवत संप्रदायाचा थोडा फार परिणाम कायम आहे; पण तोहि बराचसा पाश्चात्य नवीन मतांमुळे निश्चित झाला आहे. या दृष्टीनें मराठी वाङ्मय या शब्दाचा अर्थ प्रस्तुत विवेचना-पुरता तरी प्राचीन वाङ्मयाइतकाच सीमित करणें भाग आहे.

प्राचीन मराठी वाङ्मय

प्राचीन मराठी वाङ्मयाची सुरुवात महानु-भावांच्या वाङ्मयापासून झाली, असें आधुनिक मराठी विद्वानांचें म्हणणें आहे. अर्थातच प्राचीन मराठी वाङ्मयाचे दोन काल-खंड सामान्यपणें पडूं शकतील. एक महानुभावांचा व दुसरा त्यांच्या नंतरचा. पहिल्या काल-खंडांत निर्माण झालेल्या वाङ्मयावर अर्थातच महानुभाव तत्त्वज्ञानाची छाप पडणें अनिवार्य आहे. महानुभाव संप्रदाय हा भागवत संप्रदाय आहे. 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' हें त्यांचें सूत्र आहे. श्रीकृष्ण व दत्तात्रेय हीं त्यांचीं उपास्यें आहेत. गीता व भागवत हे त्यांचेहि पूज्य ग्रंथ आहेत. पण हा द्वैतवादी संप्रदाय आहे. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार वस्तु तो स्वतंत्र व नित्य मानतो. काय असेल तें असो पण या द्वैतवादी संप्रदायाच्या मतांचा परिणाम महाराष्ट्रांत तरी कायम राहूं शकला नाही. महाराष्ट्राच्या बाहेरच याचा प्रभाव जास्त पडला.

प्राचीन मराठी वाङ्मयाचा दुसरा कालखंड श्री ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादिकांचा आहे. हे सर्व भागवतमतानुयायी आहेत. या दुसऱ्या कालखंडांत ज्ञानदेव--तुकारामांचा वारकरी व स्वामी रामदासांचा रामदासी हे दोन संप्रदाय येतात. प्राचीन मराठी वाङ्मयाचा बहुतांश भाग या दोन संप्रदायांच्या वाङ्मयानें व्यापलेला आहे.

वारकरी व रामदासी संप्रदाय

वारकरी व रामदासी हे दोन्ही संप्रदाय अद्वैत-वादी संप्रदाय आहेत. या दोन्ही संप्रदायांत ज्ञान व भक्ति यांचा समन्वय करण्यांत येऊन अद्वैतज्ञानानंतर देखील भक्तीला स्थान देण्यांत आलें आहे. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे की रामदासी संप्रदाय हा वारकरी संप्रदायाहून पूर्णपणें स्वतंत्र असा संप्रदाय आहे. पण ही समजूत फारशी बरोबर नाही. तत्त्व-ज्ञानाच्या दृष्टीनें दोन्ही संप्रदाय एकच आहेत. फरक केवळ त्यांच्या उपास्यांत आहे. वारकरी संप्रदायांत श्रीकृष्ण किंवा पांडुरंग उपास्य आहे, तर रामदासी संप्रदायांत भगवान् श्री रामचंद्र हें उपास्य आहे. उपास्यांच्या भेदानें व त्यांच्या प्रवर्तकांच्या भेदानें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांना दोन नांवें पडलीं. बाकी त्यांच्यांतील भेद नाममात्रच आहे. कांही आधुनिक विद्वानांनी या दोन संप्रदायांत जो तरतम भाव दाखविण्याचा प्रयत्न केला तो मूळ संप्रदाय प्रवर्तकांचा नव्हे, इतकी गोष्ट ध्यानांत ठेवली म्हणजे पुरे.

अद्वैतमतवादी भागवत संप्रदाय

भागवत संप्रदाय म्हणतांक्षणींच सामान्य लोकांसमोर मध्व, रामानुज, वल्लभ, निम्बार्क इत्यादि भक्तिवादी वैष्णव संप्रदाय उभे रहातात. हे सर्व भागवत संप्रदाय भक्तीचा पुरस्कार करणारे असून द्वैतमतवादी आहेत.' त्यामुळेच जो जो भक्तिवादी संप्रदाय असेल तो तो द्वैतमतवादी संप्रदाय असलाच पाहिजे अशी सामान्य लोकांची समजूत असते. याचा परिणाम असा झाला आहे की भक्तिवादी असूनहि केवलाद्वैतमताचा पुरस्कार करणारा संप्रदाय देखील भागवत संप्रदाय असूं शकतो याची कल्पना चांगल्या चांगल्या विद्वानांनाहि येत नाही. भक्ति आणि केवलाद्वैत यांचा विरोध नसून तीं एकमेकाचीं पूरक अंगें आहेत, इतकेंच नव्हे तरी खरी भक्ति केवलाद्वैत ज्ञानाशिवाय संभवतच नाही याची कल्पना सामान्य बुद्धीला होत नाही.

अद्वैतज्ञानोत्तर भक्ति मानणारा भागवत संप्रदाय केवळ महाराष्ट्रांतच झाला असें नव्हे, तर हिंदुस्थानांतील इतर भागांतहि या मताचे प्रवर्तक झाले. उत्तर हिंदुस्थानांतील तुलसीदासांचा संप्रदाय, गुजरायेंतील नरसी मेहतांचा संप्रदाय, बंगालमधील रामकृष्ण परमहंसांचा संप्रदाय हे सर्वच ज्ञानोत्तर भक्तिवादी संप्रदाय आहेत. या संप्रदायांतील उपास्यें हीं जरी भिन्न असलीं तरी त्या सर्वांची भूमिका एकच आहे.

अद्वैतमतवादी भागवत संप्रदाय शांकर संप्रदायच

ज्या केवलाद्वैत ज्ञानाचा भक्तीशीं विरोध आहे असें पुष्कळशा विद्वानांना वाटतें त्या केवलाद्वैतमताचे आद्य प्रवर्तक भगवान् श्री शंकराचार्य. हे स्वतःच शिव व कृष्ण भक्त होते, व ही त्यांची भक्तिनिष्ठा आजन्म कायम राहिल्याचेंहि दिसून येतें. भगवान् आचार्यांच्या दृष्टीने अर्थातच त्यांनी प्रतिपादिलेलें अद्वैतज्ञान व त्यांच्या आचरणांत असलेली भवद्भक्ति यांत त्यांना तरी विरोध वाटत नसला पाहिजे हें उघड आहे.

भगवान् शंकराचार्यांच्या नंतर अद्वैत वेदान्त्यांतच दोन गट झालेले दिसतात. एक भामतीकार वाचस्पति मिश्रांचा व दुसरा पंचपादिकाकार पद्मपादाचार्यांचा. यालाच अनुक्रमें अद्वैत वेदान्तांत 'भामती प्रस्थान' व 'विवरण प्रस्थान' अशीं दोन नांवें देण्यांत येतात. 'ज्ञानादेव तु केवल्यम्' या श्रुतीच्या आधारें ज्ञानानें कैवल्याची प्राप्ति होत असल्यामुळे ज्ञानानंतर भक्ति वगैरे कांहीहि राहत नाही असें म्हणणारा हा भामती प्रस्थानवाद्यांचा पहिला गट आहे. याच्या उलट, ज्ञानानें कैवल्याची प्राप्ति झाली तरी देहपात होईपर्यंत उपाधि कायम राहत असल्यामुळे उपाधीचा पूर्णपणें नाश करून विदेहमुक्तितुल्य परमानंदता जीवन्मुक्तींत बाणण्याकरिता ज्ञान्यालाहि परमप्रेमरूपा भक्ति केली पाहिजे असें म्हणणारा विवरणकारांचा गट आहे. अद्वैत सिद्धिकार मधुसूदन सरस्वती, अप्पय्य दीक्षित, भागवतावरील प्रसिद्ध टीकाकार श्रीधराचार्य इत्यादिकांचा समावेश या गटांत होतो. मधुसूदनांनी गीतेवरील आपल्या गूढार्थदीपिका नांवाच्या टीकेंत या ज्ञानोत्तर भक्तीचें प्रतिपादन केलें आहे. त्याचप्रमाणें या भक्तीचें सौपपत्तिक विवरण करण्याकरिता त्यांनी 'भक्तिरसायन' या नांवाचा स्वतंत्र ग्रन्थ लिहिला. पंचदशीकार विद्यारण्यांनी सूतसंहितेच्या टीकेंत व श्रीधराचार्यांनी आपल्या भागवताच्या टीकेंत या ज्ञानोत्तर भक्तीचें विवरण केलें आहे. या सर्व आचार्य भक्तांनी केवळ साधनरूपाने भक्तीचा स्वीकार केला नसून साध्यरूपानें भक्तीचा स्वीकार केला आहे, ही गोष्ट लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. तेव्हा अद्वैतमतवादी राहून देखील भक्तिवादी असणाऱ्या भागवत संप्रदायाची कल्पना नवीन आहे असें नाही. शांकर संप्रदायांतीलच ती एक प्रवाह आहे हें दिसून येईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयाचें मुख्य अंग तत्त्वज्ञान

धर्माप्रमाणेंच कोणत्याहि संप्रदायाचीं मुख्यतः दोन अंगें असतात. पहिलें अंग तत्त्वज्ञान व दुसरें अंग आचार. आचारावर मुख्यतः तत्त्वज्ञानाचा परिणाम होत असल्याकारणानें तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेंच या वाङ्मयाचा विचार करावयास पाहिजे. पण या बाबतींत आज एकरूप विचारसरणी दिसून येत नाही. या भागवत धर्मानुयायांच्या वाङ्मयांत द्वैत–अद्वैत, सगुण–निर्गुण, ज्ञान–अज्ञान, माया–शक्ति इत्यादि विरोधी समजल्या जाणाऱ्या सर्वच गोष्टींचा उल्लेख व प्रतिपादन सापडत असल्यामुळे तें तत्त्वज्ञान एकजिनसी वाटण्यापेक्षा विविध मतांचें कडबोळें वाटावयाला लागतें. परिणाम असा होतो की प्रत्येक विद्वान् आपापल्या मताप्रमाणे तें लावूं पहातो व त्याचेंच समर्थन करूं लागतो. सामान्य माणसाला त्यांतील सत्य कोणतें याचा उलगडा करणें कठीण जातें. तेव्हा या भागवत धर्मानुयायांच्या तत्त्वज्ञानाचा विचार कसा करावयाचा हा प्रश्न उत्पन्न होतो.

भागवत संप्रदायांतील ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव तुकाराम, रामदास इत्यादि संतांनी लिहिलेल्या वाङ्मयांत संप्रदायाची तात्विक मांडणी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी केली असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. माऊलीच्या श्रीज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टि, अभंग इत्यादि ग्रंथांतून भागवत धर्माच्या तात्त्विक भूमिकेचें सोपपत्तिक विवरण आलें आहे. संप्रदायांतील नंतरच्या संतांनी त्याच तत्त्वांचें भाष्यरूपानें व्याख्यान केलें आहे. माऊलीच्या कांही उक्तींचा अर्थ इतका खोल आहे की तुकाराम महाराजांनी शेवटीं त्यांची खोली आपल्याला कळत नाही असें सांगून टाकून महाराजांच्या पायावर डोकें ठेवलें !

'तुका म्हणे नेणो उक्तिचिया खोली।
म्हणोनि ठेविली पायीं डोई।'

आधुनिक बुद्धिवादी जगांत अर्थातच या तुकाराम महाराजांच्या लीनतेला फारसें स्थान नाही. आजच्या बुद्धीला अगम्य असें काय आहे !

बुद्धीनेंच कोणत्याहि गोष्टीचा विचार करायला पाहिजे ही गोष्ट कांही नवीन आहे असें नाही. प्रश्न इतकाच की ती बुद्धि कशी वापरावी. पूर्ण सांगोपांग वाचन करून बुद्धीने निर्णय घेतला तर कोणाला आक्षेप घेतां येणार नाही. पण असें बहुतेक झालेलें दिसत नाही.

विवरण प्रस्थानाच्या अध्ययनाची आवश्यकता

महाराष्ट्रांतील हा अद्वैत भक्तिवादी संप्रदाय शांकर संप्रदायाचाच भाग असल्यामुळे शांकर तत्त्वज्ञानांतील विवरण प्रस्थानवाद्यांनी जे ग्रंथ संस्कृतमधून लिहिले आहेत त्याचें व्यवस्थित अध्ययन या संतांचें वाङ्मय समजण्याच्या दृष्टीने करणें आवश्यक आहे. स्थिति तर अशी आहे की पंचदशीच्या पलीकडे अद्वैत वेदान्तांतील ग्रंथांचें वाचन नाही व त्यांतहि भामती प्रस्थान वाद्यांचे ग्रंथ जितके वाचनांत येतात तितके आचार्यांचे साक्षात् शिष्य असलेल्या पद्मपादाचार्य, सुरेश्वराचार्य इत्यादि लोकांचे ग्रंथवाचनांत येत नाहीत. परिणाम असा होतो की ज्या सगुण–निर्गुणाचा थोडा फार उहापोह या विवरण प्रस्थानवाद्यांनी केला आहे त्याचें आम्हाला अजिबात ज्ञान नसतें व त्यामुळे स्याद्वादाचा आश्रय करावा लागतो. याचें उदाहरण म्हणून असें देतां येईल की अमृतानुभवांतील "एऱ्हवी सच्चिदानंद भेदें। चालली तिन्ही पदें। परी तिन्ही उणें आनंदें। केली एकें' ह्या ओवीचें पूर्ण स्वारस्य कळण्याकरिता पद्मपादाचार्यांच्या 'आनंदो विषयानुभवोनित्यत्वं चेति सन्ति धर्माः ब्रह्मणोऽपृथक्त्वेऽपि पृथगिवावभासन्ते' या पंक्तीचें पूर्ण ज्ञान असणें आवश्यक आहे. पण संस्कृत ग्रंथ मराठीच्या विरोधांत बसविल्यानंतर त्यांचें अध्ययन व्हावें कसें ?

श्रीज्ञानेश्वरांचे भाष्यकार तुकारामादि संत

एखाद्या सिद्धान्ताविषयीं संदेह उत्पन्न झाल्यास तो सिद्धान्त चूक आहे असें न म्हणतां त्याचें स्पष्टीकरण करणारीं त्यावरील भाष्यें वाचून समाधान करून घ्यावें असें व्याकरण शास्त्रांतील एक परिभाषासूत्र सांगतें (व्याख्यानतो विशेषप्रतिपत्तिर्नहि संदेहादलक्षणम्।). पण आधुनिक बुद्धिवाद्यांना तेंहि पटण्यासारखें नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वस्तुतः पूर्व संतांच्या ग्रंथांचें स्पष्टीकरण करणारे उत्तरोत्तर संतांचे ग्रंथ असतात. म्हणूनच श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या ग्रंथांचा अर्थ लावावयाचा असल्यास नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादिकांच्या ग्रंथांवरून तो लावावयास पाहिजे. महाराजांच्या प्रत्येक शब्दाविषयीं जितकी पूज्य बुद्धि त्यांच्या संप्रदायांतील संतांना राहील तितकी आमच्या सारख्यांना राहणें कठीण आहे. त्यामुळे माऊलीच्या अर्थाची ओढाताण तरी ते खचित कमी करतील.

शांकर तत्वज्ञानाचें जें ध्येय तेंच भागवत संप्रदायाचें ध्येय

कोणताहि संप्रदाय कोणच्या तरी ध्येयानें प्रवृत्त झालेला असतो. भारतीय तत्वज्ञानांत तर या गोष्टीला फार महत्व आहे. म्हणूनच हिंदुस्थानांतील कोणताहि दर्शनकार पहिल्यानें आपल्या दर्शनाचें प्रयोजन काय आहे हें सांगितल्याशिवाय पलीकडे आपल्या दर्शनाविषयीं बोलत नाही. केवळ ज्ञानाकरिता ज्ञान किंवा कर्माकरिता कर्म ही कल्पना अभारतीय आहे. प्रयोजनाशिवाय मूर्ख देखील कोणतीहि गोष्ट करण्यास प्रवृत्त होत नाही असें भारतीय दर्शनकार मानतात. (प्रयोजनमनुद्दिश्य न मंदोऽपि प्रवर्तते।) आजच्या मात्र विद्वानांना ही गोष्ट मान्य असलेली दिसत नाही. कोणचेंहि तत्वज्ञान बरोबर आहे किंवा चूक आहे हें ठरविण्याला कोणता तरी निकष असावयाला पाहिजे. केवळ विचाराकरिता विचार संभवत नाहीं. प्रसिद्ध भारतीय तत्वज्ञानी वाचस्पति मिश्रा यांनी कोणत्याहि गोष्टीविषयीं जिज्ञासा होण्याकरितां दोन गोष्टी आवश्यक आहेत म्हणून सांगितलें. एक संदिग्धता व दुसरी गोष्ट प्रयोजन. ज्या ठिकाणीं या दोन गोष्टी नसतील त्या ठिकाणीं जिज्ञासा उत्पन्न होत नाही. जी गोष्ट स्पष्टच आहे त्या विषयीं जिज्ञासा होण्याचें कारणच काय ? (यदसंदिग्धमप्रयोजनं च न तत्प्रेक्षावत्प्रतिपित्सागोचरः)

मनुष्याचें ध्येय आत्यंतिक सुखप्राप्ति

मनुष्याच्या सर्व व्यवहारांचें विश्लेषण केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की त्या मनुष्याचा सर्व व्यवहार सुखाची प्राप्ति व दुखा:ची निवृत्ति ह्या दोन गोष्टीकरितां होत असतो. तेंहि सुख क्षणिक असावें असें त्याला वाटत नाही. त्याप्रमाणेच दुःख देखील क्षणिक नाहीसें व्हावें व दुःख कधीच नसावें असेंच त्याला वाटत रहातें व त्यामुळेच कोणतीहि क्रिया करण्याकरिता प्रवृत्त होत असतांना तो ही सुप्त इच्छा मनांत ठेवूनच व्यवहार करतो. ह्यालाच दर्शनकारांनी आत्यंतिक दुःखनिवृत्तिपूर्वक परमानंद प्राप्ति हें नांव दिलें आहे. भागवत संप्रदायानुयायांनी हेंच प्रयोजन आपल्या संप्रदायाचें ठेवलें आहे. या ध्येयालाच निरनिराळीं नांवें देण्यांत आलीं आहेत. यालाच परब्रह्म, ईश्वर, भगवान् इत्यादि नांवें आहेत.

आत्यंतिक सुखाचें साधन अविवेकी प्रेम

भागवत संप्रदायानुयायांनी ज्यांना ज्यांना हें आत्यंतिक सुख प्राप्त करून घ्यावयाचें असेल त्यांना त्यांना हा 'रोकडा भिक्षु' मिळवून देण्याचें आश्वासन दिलें आहे. व त्यांची प्रतिज्ञा आहे की या मार्गानें मिळणाऱ्या मोक्षांत जी परमानंदता आपल्या ठिकाणीं बाणणार आहे ती ब्रह्मज्ञान्यालाहि लाळ घोटायला लावणारी व मुक्त झालेल्यांनाहि आपली आत्मस्थिति सोडावयाला लावणारी आहे. (घोटवीन लाळ ब्रम्हज्ञान्या हातीं। मुक्ता आत्मस्थिति सांडवीन) एवढ्या मोठ्या सुखाची प्राप्ति करण्याकरिता अत्यंत परिश्रमयुक्त साधना करावी लागेल अशी कदाचित् कोणाची समजूत होईल. पण याहि बाबतींत या संतांनी आपल्याला निर्भय केलें आहे. सामान्य लोकांच्या ठिकाणीं असलेलें स्त्रीपुत्रादिकांचें प्रेमच याहि मार्गांत उपयोगी पडणारें साधन आहे. फरक एवढाच की त्या प्रेमाचें आलंबन स्त्रीपुत्रादिक राहत नसून हें आत्यंतिक सुखस्वरूप सगुण ब्रह्म राहतें; यालाच भगवान् श्रीरामचंद्र इत्यादिक नांवें आहेत. या ठिकाणच्या प्रेमाची अट एवढीच आहे की तें प्रेम अविवेकी माणसाचें पाहिजे. विचारवंताचें नको. अविवेकी माणसाच्या प्रेमांत त्या प्रेमाच्या विषयाव्यतिरिक्त दुसरा विषय राहत नाही. त्या विषयाशिवाय तो सर्व देहभान विसरून जातो. तशा तऱ्हेची प्रीति या ठिकाणीं पाहिजे. मग कोणचीही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शमदमादि साधन संपत्ति पहिल्याने अंगीं बाणली नसली तरी चालेल. (या प्रीतिरविवेकानां विषये- ष्वनपायिनी । त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्मापसर्पतु ।)

सगुण व निर्गुण ब्रह्म

ज्या आत्यंतिक सुखाच्या प्राप्तीला मोक्ष, ईश्वर, भगवान्, परब्रह्म इत्यादि नांवें देण्यांत येतात तें पर- ब्रह्म निर्गुण आहे की सगुण आहे या विषयीं तत्त्व- ज्ञान्यांत मोठमोठीं रणें माजून निरनिराळे संप्रदाय निर्माण झाले. भागवतानुयायांनी हे वाद शुष्क व निरर्थक आहेत असें सांगून ब्रह्म सगुणहि आहे व निर्गुणहि आहे असें सांगितलें व या वादाला निकालांत काढलें. 'ब्रह्म सगुण निर्गुण । तुका आरंभी कीर्तन ।' वस्तुतः हे दोन्ही शब्द सापेक्ष आहेत व परब्रह्म वस्तु या दोहोंहून वेगळी आहे. 'सगुण निर्गुण गुणांचे अवगुण । हरिविणे मन व्यर्थ जाय ।'

या भागवतानुयायांच्या सगुण ब्रह्माची थोडी कल्पना आपल्याला येण्याकरितां सगुण व निर्गुण या शब्दांच्या अर्थाचा विचार करणें अप्रस्तुत होणार नाही. गुण हा शब्द मुळांतल्या संख्या शासनांतला आहे. सत्व, रज व तम हे प्रकृतीचे तीन गुण पुरुषांना दोरीप्रमाणें बांधून ठेवतात. म्हणून त्यांना गुण म्हणावयाचे. अर्थातच सत्व, रज व तम या गुणांनी युक्त जें सगुण आहे तें मर्यादित नाशिवंत व प्रकृतीचा परिणाम ठरतें. हे तीन गुण परब्रह्माच्या ठिकाणीं राहत नाहीत. परब्रह्म त्याहून निराळें आहे हें सांगण्याकरितां परब्रह्माच्या ठिकाणीं यांच्या विरोधी निर्गुण शब्दाचा प्रयोग कर- ण्यांत येतो. भगवान् आचार्यांनी आपल्या गीता भाष्यांत ही गोष्ट स्पष्ट केली आहे. 'निर्गुण सत्वरजस्तमांसि गुणास्तैर्वर्जितम् ।'

सगुणाचा दुसरा अर्थ आहे गुणगुणीभाव विरहित. परब्रह्म सच्चिदानंदस्वरूप आहे असें म्हणत असतांना परब्रह्मरूप आधाराच्या ठिकाणीं सच्चिदानंद गुण आहेत अशी कल्पना यावयाला पाहते. ही आधार आधेयाची कल्पना सोडून परब्रह्म तेंच सच्चिदानंद व सच्चिदानंद तेंच परब्रह्म ही कल्पना ग्रहण व्हावी म्हणून परब्रह्म निर्गुण आहे म्हणजे गुणगुणीभाव- विरहित असें म्हणण्यांत येतें. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी 'अमृतानुभवांत' सच्चिदानंद पदत्रय विवरणांत गूळ व त्याची गोडी, कापूर व त्याचा परिमळ इत्यादिकांचीं उदाहरणें देऊन ही गोष्ट स्पष्ट केली आहे. अमृतानु- भवांतील हें सर्व विवरण शांकर तत्त्वज्ञानाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि तत्त्वज्ञानाशीं जुळत नाही हें ओघानें आलें म्हणून सांगावेसें वाटतें.

निर्गुण परब्रह्माची कल्पना आधुनिक विद्वानांना लवकर पटणारी व आवडणारी आहे; कारण परब्रह्म निर्गुण असल्यामुळे त्यांच्यादृष्टीने तें कोणच्याहि तऱ्हेचा हस्तक्षेप त्यांच्या जीवनांत करूं शकत नाही. या निर्गुण परब्रह्माची कल्पना एखाद्या दगडासारखी हे विद्वान् करतात की काय न कळे. परब्रह्म निर्गुण असलें तरी चैतन्यरूप आहे व तेंहि अत्यंत व्यापक चैतन्यरूप आहे. चैतन्याचा धर्म ज्ञान हा आहे. याच चैतन्याचा लाखांश असलेला हा ज्ञानरूप जीव आपल्या अल्पज्ञानाच्या भरवशावर अखिल ब्रह्माण्डाला गवसणी घालण्याची भाषा बोलूं शकतो. पण याचाच आधाररूप असलेलें अमर्याद चैतन्य कांहीच करूं शकत नाही ही कल्पना मात्र तो कशी करूं शकतो हें कळत नाही. परब्रह्म सच्चिदानंदरूप आहे व हीच सच्चिदानंदरूपता पर- ब्रह्माची शक्ति आहे. यांतच चैतन्य व आनंद धर्माचें स्फुरण त्याच्या ठिकाणीं होत राहतें. तें दगडादि जड वस्तूप्रमाणे स्फुरणरहित नाही. तेव्हा परब्रह्माच्या ठिकाणीं सगुणत्वाचा निषेध जो करण्यांत येतो तो सत्वरजतमोगुणयुक्त सगुणाचा आहे. म्हणूनच याला निर्गुणहि म्हणावयाचें. या दृष्टीने निर्गुण असलेलें परब्रह्म सच्चिदानंदरूपाने सगुणहि राहूं शकतें व ही त्याची सगुणता निर्गुणतेच्या विरोधी नाही. भागवतधर्मानुया- यांनी मानलेलें सगुण सत्वरजतमाच्या पलीकडलें सच्चिदानंदात्मक सगुण आहे.

व्यापक व अव्यापक शब्दांची कल्पना

सगुण व निर्गुण शब्दाप्रमाणेच व्यापक व अव्या- पक शब्दांच्या बाबतींतहि लोकांत गैरसमज असलेला दिसून येतो. निर्गुण परब्रह्माच्या ज्ञानांत व्यापक ज्ञान होत असून सगुण परब्रह्माच्या ज्ञानांत मर्यादित किंवा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकदेशी ज्ञान होतें असें त्यांना वाटतें. पण विचार जर केला तर निर्गुण ब्रह्मज्ञानांत होणारें ज्ञान व भक्तींतील सगुण ब्रह्माचें होणारें ज्ञान यांत कांहीहि फरक नाही हें कळून येईल.

आपल्या मनाला नामरूपात्मक मर्यादित पदार्थांचें ज्ञान करून घेण्याची सवय झालेली आहे. नामरूपा-विरहित अमर्याद अशा वस्तूचें आकलन आपलें मन करूं शकत नाही. ज्या मनाच्या वृत्तीने आपण ज्ञान करूं इच्छितों ती वृत्ति देखील मर्यादित आहे. वृत्तीच्या आटोक्यांत जितकें ज्ञान येतें तें सर्व त्यामुळेच मर्यादित होतें. अद्वैतवेदान्त्यांनी ब्रह्मज्ञानांत वृत्तिव्याप्तीनें ज्ञान होतें असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ वृत्तीला आधारभूत असलेल्या चैतन्याला वृत्ति ज्यावेळीं ग्रहण करते त्यावेळीं तें ब्रह्म वृत्ति पुरतें मर्यादित होतें असा आहे. अमर्याद समुद्राचें ज्ञान होत असतांना आपल्या दृष्टीच्या सीमेंत जेवढा समुद्र येतो तेवढयाच समुद्राचें आपल्याला ज्ञान होतें. पण आपण बोलतांना मर्यादित समुद्राचें ज्ञान झालें असें म्हणत नाही. अमर्यादित समुद्र आपण पाहिला असें म्हणतों आणि हें म्हणणें चूक आहे असें नव्हे. याचें कारण असें की बाकीचा समुद्रहि तसाच आहे हें आपलें ज्ञान त्यावेळीं कायम असतें. अमर्याद वस्तूचें ज्ञान ती वस्तू अमर्याद आहे असें समजणें हेंच होय. ब्रह्मज्ञानांत वृत्तीच्या आटोक्यांत येणाऱ्या ब्रह्माचें ज्ञान होत असल्यामुळे तें मर्यादित ज्ञान होतें. पण असें असलें तरी बाकीचें ब्रह्महि तसेंच आहे. असें ज्ञान कायम रहात असल्याकारणानें अमर्याद ब्रह्माचें ज्ञान होतें असें समजण्यांत येतें. या दृष्टीनें विचार केल्यास भागवतमतानुयायांच्या मनांतहि ज्या अर्थानें ब्रह्मज्ञानांत ब्रह्माचें ज्ञान होतें त्याच अर्थानें सगुण ब्रह्माचें ज्ञान होतें. फरक फक्त एवढाच असतो की ही वृत्ति ज्ञानवृत्ति रहात नसून प्रेमवृत्ति रहाते. वृत्तीला आधाररूप असलेल्या ब्रह्माकडे या प्रेमवृत्तीचा प्रवाह सोडण्यांत येऊन प्रेमवृत्तीनें तें ब्रह्म व्यापलें जातें. यांत ब्रह्मज्ञानाप्रमाणेंच तें ब्रह्म प्रेमवृत्तीनें व्याप्त होतें व तें ज्ञान मर्यादित इव होऊनहि त्याच्या अमर्यादतेंत कमीपणा येत नाही.

भक्ताच्या प्रीतिवृत्तीचा प्रवाह परब्रह्माकडे धावूं लागतांच तेंहि परब्रह्म ज्ञानरूप व प्रेमरूप असल्यामुळें भक्ताच्या प्रेमानें उचंबळून येतें व भक्ताच्या आवडीप्रमाणें नामरूपात्मक बनतें. या सगुणपणांत भक्तांना परब्रह्माच्या अमर्यादतेचें विस्मरण कधीच होत नाही. 'न तत्र माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः।' म्हणण्याचा अर्थ असा की अमर्यादित्वाची जाणीव न सुटल्यामुळे मर्यादित्वानें भासणारें सगुणरूपहि अमर्यादच असतें. तुकाराम महाराज म्हणतात—'रूप रेखा नाही जयासि आकार। तो आम्ही साकार भक्तीं केला।' नामदेव महाराज म्हणतात—'निर्गुणीचें वैभव आलें भक्ति विणे। ते हे विठ्ठल वेणें ठसावलें।' यांच्या सगुणाच्या ज्ञानांत निर्गुणज्ञानाचा लोप झालेला नाही. पाणीच पाण्यावर खेळावयाला लागून जर त्यांत साकारत्व निर्माण झालें व मूळ पाण्याचें ज्ञान लोपून जर त्याच्या विरोधी कांही प्रकार झाला असें वाटलें नाही तर पाण्याच्या ठिकाणीं भासणाऱ्या नामरूपात्मक साकारानें काय हानि केली? अधिष्ठानाचें ज्ञान लोपून जर साकारत्व भासलें तर तें एकदेशी, मर्यादित, भ्रमरूप आहे असें म्हणतां येईल. पण तसें जर नसेल तर तो मूळ वस्तूचा विलास होईल.

द्वैत व अद्वैत

सगुण व निर्गुण शब्दांप्रमाणे द्वैत व अद्वैत या शब्दांच्या बाबतींत लोकांत विपरीत समजूत असलेली दिसून येते. अद्वैत दशा म्हणजे ज्या ठिकाणीं कांहीहि रहात नाही, जवळ जवळ शून्य दशा अशी कांहीतरी विचित्र समजून पुष्कळशा लोकांची दिसते. द्वैत खोटें म्हणजे स्वतंत्र सत्तात्मक दोनपणा नाही एवढाच अद्वैताचा अर्थ आहे. म्हणूनच शांकर वेदान्तांत अद्वैताची कल्पना देतांना (भेदं व्यासेधयामः, किंवा पृथक् सत्ता शून्यत्वं साध्यते न तु ऐक्याभित्येण) भेदाचा आम्ही निषेध करितों असें म्हटलें आहे. परब्रह्म जर चिद्रूप व आनंदरूप आहे तर त्या ठिकाणीं ज्ञानाचें व प्रेमाचें स्फुरण झाल्याशिवाय कसें राहील? या स्फुरणांत पाण्यावर लहरी उठावी व एकाच पाण्याच्या ठिकाणीं लहरी व लहरीला आधाररूप पाणी असा दोनपणा निर्माण व्हावा तसा प्रकार होतो; पण लहरी व पाणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या दोन शब्दांचा वापर केला तरी आपल्या ज्ञानांत दोन अलग वस्तूंची कल्पना न येतां केवळ एक वस्तूंच कायम राहते. हा दोनपणा एकपणाच नव्हे काय ? ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ' हे एकचि नव्हे एक सरे । दोहीं दोहींपणा नाही पुरे । काईं नेणों साकारे । स्वरूप इए । ' एकपणा म्हणावा तर आधेय व आधार असा दोनपणा भासतो. पण दोनपणा म्हणावा तर त्या दोघांना स्वतंत्र अस्तित्व नाही. त्यांच्या ठिकाणचें साकारपण कसें आहे हें सांगतां येत नाही. नामरूपांच्या योगाने भासणारें साकारत्व अधिष्ठानाचें ज्ञान कायम ठेवून भासत असल्यास तें साकार निराकारतेच्या तोडीचें आहे. भगवान् आचार्यांनी ब्रह्माहून नामरूपें अलग ठेवून जर स्वतंत्र वस्तुत्वाने त्यांची प्रतीति होत असेल तर तें मिथ्या, ब्रह्माशीं एकरूप होऊन जर तें भासत असतील तर तें सर्व सत्यच आहे असें म्हटलें आहे. (अतः सदात्मना सर्वव्यवहाराणां सर्वविकाराणां च सत्यत्वं सतोऽन्यत्वेचानृतत्वमिति । छं ६-३-२) दोनपणा खोटा म्हणजे मूळ वस्तूचाच विलास आहे असें वाटणें याला अद्वैत म्हणतात व यांच्या विरोधी मूळ वस्तू विसरून भासणारा दोनपणा स्वतंत्र सत्तात्मक वाटणें द्वैत म्हटल्या जातें.

संतांनी मानलेलें सगुण ब्रह्म निर्गुण ब्रह्माचें ज्ञान कायम ठेवून निर्गुणाच्या सच्चिदानंदादि गुणांनी युक्त भासत असल्यामुळे तें सगुण असलें तरी निर्गुण आहे. अशा निर्गुण व सगुणांत श्रेष्ठ कनिष्ठ भाव पाहणें नाथ म्हणतात ' मूर्खपणा ' आहे. (निर्गुणाहुनि सगुण न्यून । म्हणे तो केवळ मूर्ख जाण । सगुण निर्गुण दोन्ही समान । न्यून पूर्ण असेना ।)

आपणासह सर्व जगत् चिद्विलास

संतांच्या प्रेमाचें आलंबन असलेलें सगुण ब्रह्म सगुण निर्गुणादि सापेक्ष कल्पनाविरहित आहे हें आतापर्यंत आपण पाहिलें. आता नामरूपात्मक जें विश्व-सगुण आहे त्याचा विचार करूं. सच्चिदानंदरूप ब्रह्मापासून सर्व जगत् झालें व तेंच स्वयंवेद्य आत्मरूप सर्व जगताचें आद्य तत्त्व आहे असें भागवतमतवादी मानतात. (ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या जे जे स्वयंवेद्या । आत्मरूपा) त्या अशा चिद्रूप व आनंदरूप ब्रह्मापासून झालेलें सर्व विश्व अर्थातच चिद्रूप व आनंदरूप आहे. मातीपासून झालेला घट जसा मातीरूप, त्याचप्रमाणे ज्ञानरूप व आनंदरूप ब्रह्मापासून झालेलें जग ज्ञानरूप व आनंदरूप आहे. विश्वाचा ज्ञानरूपाने व आनंदरूपाने ज्या महापुरुषांना प्रत्यय येत असेल ते अर्थातच यथार्थज्ञानी म्हणावे लागतील. या दोन प्रत्ययांपैकी आपल्याला कोणता प्रत्यय येतो याचा आपणच विचार करावयाला पाहिजे. यथार्थ प्रत्ययालाच अज्ञान म्हणतात. अज्ञान म्हणजे ज्ञानाचा अभाव नव्हे. शांकर वेदान्तांत ज्याला अज्ञान, माया, भ्रम इत्यादि नावें आहेत, तें अज्ञान म्हणजे विपरीत ज्ञान होय. सच्चिदानंदरूप ब्रह्माशिवाय दुसरी वस्तु सिद्ध होत नसल्याकारणाने नामरूपादिकांनी आपल्यासह भासणारें सर्व विश्व सच्चिदानंदरूप आहे हा भागवतमतानुयायांचा सिद्धान्त आहे. व हाच सिद्धान्त शंकराचार्यांचा आहे. 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' हा शांकरवेदान्तांतील सिद्धांत आहे. ब्रह्माच्या सच्चिदानंदादि धर्मांनी जर जगताची प्रतीति येत नसेल व त्या धर्मांच्या विरोधी असलेल्या असत् व दुःखरूप धर्मांची प्रतीति येत असेल तर अशा विपरीत धर्मांनी भासणारें जगत् मिथ्या म्हणजे खोटें, भ्रमरूप म्हणजे अयथार्थ आहे असें शांकरवेदान्ताचें म्हणणें आहे. जगन्मिथ्या म्हटल्याबरोबर बौद्धांच्या शून्यत्वाची कल्पना घेऊन जगत् सर्व मिथ्या ठरविल्यावर कांहीहि राहत नाही असें वाटूं लागतें. पण तुम्हांला विपरीत प्रतीत होणारें जगत् मिथ्या ठरून त्या जागीं नामरूपांनी नटलेलें सच्चिदानंदरूप जगत् सत्य ठरलें तर हानि होईल की लाभ होईल हेंच कळत नाही. जगन्मिथ्या म्हणणाऱ्या तत्त्वज्ञान्यांना जगतांतील नामरूपांत तोडमोड करावयाची नाही. जगताकडे पाहत असतांना यथार्थ ज्ञानाची दृष्टि कोणती असावयाला पाहिजे हें मायावाद, अज्ञानवाद, भ्रमवाद सांगतो. जगताकडे पहाण्याचा आजचा दृष्टिकोण जर यथार्थच असला तर तत्त्वज्ञानाची कोणती आवश्यकता ? भामतीकारांनी सांगितल्याप्रमाणे असंदिग्ध वस्तूविषयीं जिज्ञासा होत नाही, जगांत आज सुख व दुःख

अनुक्रमणिका
मराठीच्या विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्याला भासतात. पूर्ण सुखरूप ब्रह्माच्या ठिकाणीं दुःखाची प्रतीति कशी आली ? सुख व दुःख दोन्हीहि ब्रह्माचे धर्म मानल्यास अत्यंत विरोधी धर्मांचें ब्रह्म मानावें लागेल. तसेंहि मानून सुखदुःख त्याचा स्वभाव आहे असें मानल्यास दुःख नाहीसें करण्याची इच्छा कां होते ? वस्तु कांही आपल्या स्वाभाविक धर्मांचा त्याग करूं इच्छित नाही. स्वाभाविक धर्मांचा त्याग करणें म्हणजे आपलाच नाश करणें होय. दुःखाशिवाय सुखाची कल्पना होत नसल्यामुळे सुखाकरितां दुःख पाहिजे असें कोणी म्हणतील. या म्हणण्यांत सुखाचें साधन दुःख मानल्यास सुख जशी अनुकूल संवेदना तशी दुःख देखील त्याचें साधन म्हणून अनुकूल संवेदना मानावी लागेल. पण दुःखाच्या अनुकूलतेची कल्पनाच कोणी करूं शकत नाही. सुख व दुःख इतक्या विरोधी संवेदना आहेत की एक संवेदना असतांना दुसरी राहूं शकत नाही. दुःखाच्या अपेक्षेने सुखाची जाणीव होते ही गोष्ट खरी. पण सुखाची जाणीव सुख नव्हे. ती सुखाची भोक्तृत्व-दशा आहे. मी सुखी म्हणण्याच्या क्षणापूर्वी जी जाणीव-नेणीवविरहित स्थिति त्याला सुख म्हणतात. थोडक्यांत म्हणजे ब्रह्म जर सुखरूप असेल, ज्ञानरूप असेल व सद्रूप असेल तर तें दुःखरूप, जडरूप व असद्रूप राहूं शकत नाही. त्यापासून झालेला सर्व जगद्रूप पसाराहि तसाच असावयाला पाहिजे. तसा जर आपल्याला प्रत्यय येत नसेल तर आपल्या पाहण्यांत कांहीतरी चूक आहे हें म्हणणें अनिवार्य आहे. यालाच अज्ञान म्हणतात.

अमृतानुभवांतील चिद्विलास

अमृतानुभवांतील चिद्विलासाचें वर्णन वाचून श्रीज्ञानेश्वर महाराजांना आचार्यांचा मायावाद किंवा अज्ञानवाद मान्य नाही असें कांही विद्वान म्हणतात. पण आचार्यांना तरी तत्त्वतः अज्ञान कोठे मान्य आहे ? आचार्य तत्वतः अज्ञान आहे असें जर मानत असते तर त्या अज्ञानाची निवृत्ति कधीच झाली नसती. आचार्य सर्व चिद्विलास आहे असेंच मानतात. व ज्या शुक्राचार्यादिकांना तशी प्रतीति येते त्यांना ते आपला मायावाद सांगत नाहीत. आचार्यांच्या एका शिष्याने त्यांना प्रश्न केला की महाराज, हें अज्ञान कोणाला भासतें ? आचार्यांनी उत्तर दिलें तूंच या प्रश्नाचें उत्तर दे. कारण मला अज्ञान भासत नाही. तूं ब्रह्माच्या विरोधी धर्मांची प्रतीति बोलून दाखवितोस म्हणून मला म्हणावें लागतें की तू चूक आहेस म्हणून.

आचार्यांच्या अज्ञानावर ज्या इतर सर्व वेदान्त्यांनी आक्षेप घेतला त्यांनाहि एक प्रश्न विचारतां येईल की तुम्ही अज्ञान मानत नसतांना आपल्या संप्रदायाचा उपदेश कोणाला करता ? तुमच्या संप्रदायाचें यथार्थ ज्ञान इतरांना नाही तें यथार्थज्ञान त्यांना व्हावें ही कल्पना गृहीत धरल्याशिवाय तुम्ही आपल्या ज्ञानाचा उपदेश करूं शकतां काय ? आम्ही आमच्या संप्रदायाच्या द्वारें इतरांना यथार्थज्ञान करून देतों असें म्हणावयाचें असल्यास अज्ञानाची कल्पना यापेक्षा आणखी कोणती निराळी आहे ? विपरीत ज्ञानाची कल्पना म्हणजेच अज्ञान होय. ती कल्पना गृहीत धरल्याशिवाय कोणालाच आपल्या ज्ञानाचा उपदेश करतां येणार नाही.

भागवतमतानुयायांचे शिव व शक्ति

अमृतानुभवांत ज्या शिव व शक्तीचें वर्णन आलेलें आहे तें वर्णन शांकरतत्त्वज्ञानाशिवाय इतर कोणत्याहि वैष्णव संप्रदायाशीं जुळतें नाही. या सर्व वर्णनांत शिव व शक्ति असे दोन शब्द वापरण्यांत आले तरी त्या दोघांचाहि अर्थ एकच कसा आहे हें ज्ञानेश्वर महाराजांनी ठिकठिकाणीं सांगितलें आहे. शिवाचा विचार करूं गेल्यास शक्तिच येते. शक्तीचा विचार करूं गेल्यास शिवच हातीं येतो. सूर्याच्या ठिकाणीं ज्याप्रमाणे प्रभा असावी व प्रभेच्या योगाने ज्याप्रमाणें सूर्यच हातीं यावा त्याप्रमाणे यांचा दोनपणा मिळून एकपणा आहे. (जैसी सूर्यी मिरवे प्रभा । प्रभें सूर्यत्वचि गाभा । तैसी भेद गिळीत शोभा । एकचि जें ।) बिंब प्रतिबिंबाचा बोध करून देतें व प्रतिबिंबामुळें बिंबाचें अनुमान होतें. त्याप्रमाणे एकच वस्तु द्वैताच्या मिषाने मिरविते. (कां बिंब प्रतिबिंबा द्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमानक । तैसे द्वैत मिसे एक । मिरवत असे) जर वस्तु एकच आहे तर हा तरी दोनपणा कां ? याचें एक उत्तर असें की चैतन्य

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

वस्तु दगड नव्हे म्हणून. 'चैतन्यें हि स्फुरणं स्वाभाविकं' चैतन्याच्या ठिकाणीं ज्ञानरूपाचें स्फुरण स्वाभाविक आहे. त्यामुळेच ज्ञान व ज्ञानवृत्ति असा दोनपणा भासतो; पण हा दोनपणा एकपणा अफूट ठेवून भासतो. तो वस्तूचा विलास आहे. आपणच आपल्याला जाणत असतांना जसा आपल्याच ठिकाणचा दोनपणा आपल्या ठिकाणचें एकपण कायम ठेवून रहातो तसाच हा प्रकार आहे. (तैसें आपणया आपण। जाण तें नव्हे जाण) भोग्य आणि भोक्ता, दृश्य आणि द्रष्टा हे दोन्हीहि अफुट असा अद्वैतांत नाहीसे होतात. (तैसे भोग्य आणि भोक्ता। दिसे आणि देखता। हे सरले अद्वैता। अफुटामाजी)

(अपूर्ण)

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २-४-०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १-४-०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १-८-०
४. अंमलदार	(नाटक) लेखक-श्री पु. ल. देशपांडे	रु. २-०-०
५. भारती	(नाटक) लेखक-श्री नाना जोग	रु. १-८-०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका-श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०-१२-०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०-६-०
२. नाटककार गडकरी	--श्री द. रा. गोमकाळे	रु. ०-६-०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	--कविभूषण ब. ग. ऊर्फ अण्णासाहेब खापर्डे	रु. ०-८-०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०-८-०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ
केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

काळु घराण्यांतील कागदपत्रें

शंकर गोविंद चट्टे

आपासाहेबांचा अहवाल

(मागील अंकावरून पुढे चालूं)

ऐसे आस्ता वमदद साहेव मस्तुराच्या पळोन मकाणास गेले. हरचंदसाहेव मजकुरास समजावले जे आम्हास त्याहास कांही इजा देणे मंजूर नाही. फिसाद बरपा व्हावी म्हणोन कैद केले होते. बिलफैल जागीर देऊन एक जाय ठेवण्यांत येईल. ऐसे आमचे सवालास न मानता जोरावरीने इलाहावादेस रवाना केले. तेव्हाहि सरकार कंपनीचे दोस्तीवर लक्ष देऊन खामोष राहिले. यानंतर साहेव मजकुरांनी अर्ज केला जे हुशंगावादचा किल्ला आम्हास खाली करोन द्यावा. आम्ही जबाब दिला की अवघा खिलाफ कौल लायक......तुमचे नाही. पुन्हा इजहार केला जे पेंढारियाचे वंदोवस्ताकरिता आमची फ़ौज या प्रांती राहील. सवब बाहेर ठेवण्याकरिता जरूर असे. जे उभयता सरकारची जुदाई मुतसवर नाही. सवब त्यास सांगितले जे सरंजाम ठेवण्याकरिता जाय देतो परंतु किल्ल्याचे संरक्षणाचे शिबंदी इकडील राहील व आपलेहि माणसे सरंजामचे निगादास्तीकरितां ठेवावेत. मात्र किल्ल्यांत अमल आपला न व्हावा अगर आमचे सरकारांतील असबाब कमजास्त झाल्यास जबाबदेही करावी लागेल. या जबाबास कबूल न करता पुरवनीद होऊन नविस्ता दिला जे पेंढारियाचे बंदोबस्ताबाद किल्ला खाली करून दिला जाईल. बावजुद(?) सरकारची मोहवतमुल्कानी म्हणोन किल्लाहि हवाली केला. बाद कांही एका रोजाने पांच हजार लोकांची दरखास्त केली. जबाबहि देण्यांत आला जे मवाफिक करार तीन हजार सवार व दोन हजार प्यादे आपले फौजेंतून बिलाउजर देण्यांत येतील साहेब मजकुराने हुज्जत दरम्यान आणली जे तुमची फौज आम्हास मंजूरी नाही. आम्ही खुद नोकर ठेवितो त्याचा तनखा आपण द्यावा. आम्ही जबाब दिला जे ऐसा खिलाफ कौल पहिलेपासून कधीहि झाला नाही. तहनाम्यात जे लिहिले असेल ते फियावैन मंजूर. हाहि जबाब दिला तो नामंजूर करून निहायत रदबदलीच सुरू केली. तेव्हा दोन पलटणे साहेब मजकुराचे भावाबरोबर राहत होती ती व तीन हजार स्वार मवाफिक तवियत साहेब मस्तूर आपले फौजेतून निवाड करून दिले. पुन्हा जाहीर केले जे सवारात साहेब लोकांची भरती करावी. या मुकद्म्यात हरचंद आम. समजाविले की दरेग कोणेहि ठिकाणी मुनासब नाही. आपले कदिमं ऐना बमोजिब मुस्तकिम असावे परंतु आमचे हरगिज न मानता साहेबांनी इंग्रजाची भरती करविली. ऐसी जास्ती (ज्याजती ?) साहेब मजकुराकडोन जाही(रा)त आली असता दोस्तसरकारची निहायेत मंजूर खातीर होती सबब वाफिकजोरी साहेबाची ज्यायज न जाणोन दोस्तीचा रिस्ता कतआ करणे. आपले बरपसंद जमके (?) दिगरकदिमूत आयमापासोन जो कोण्ही आम्हालोकांत मसनदशीन होतो तेव्हा वास्तेंमुबारक बादीच्या वाजेतोहफे सातारे. वाले वगैरे दोस्ताकरिता जावजा पाठविण्यांत येतात व तिकडोनहि खतमुबारकीचे मैं खिलअत या प्राचीन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संप्रदायानुरुप आम्हीहि साहेब मजकुराचे सल्लेने स्वतः मयलबाजमा सातारेवाल्यांकडेच पाठविले व तिकडोनहि बइसासबाब अलफिष्टन साहेब इकडील खताचा जबाब मयाखिलअत रवाना जाला तो पोहचलाच नाही. इतकियांत फियाबैन बाजीराव पेशवे पुणेवाले व सरकार मकसुहचे जंगफिसाद नमूद जाला. नंतर खत मयाखिलअत जेव्हा आम्हापासीं पोहचंले तेव्हा वस्त्र घेण्याकरिता दुसरे मिसल हैद्राबादवाले वगैरे राजाचे जमा करोन साहेब मजकुरास बोलाविलें त्यास साहेब मजकूरांनी आपण जातीने न येता जबाब सांगोन पाठविला कीं आमचे सरकारशी व बाजीरावसाहेबाशी लढाई सुरूं आहे त्यास खिलअत न घ्यावी. आम्ही जबाब पाठविला जे खिलअत सातारेवाल्याचे येथून असती. त्यांत बाजीरावाचा कांही इलाका नाही. व सरकारकंपनी अंग्रेजबहाद्दुर व सातारेवाले यांचे दरम्यान खलप नाही. दुसरे पहिले खिलअत नबाब सिकंदरजा हैद्राबादवाले याची घेतली आहे ज़र करता खिलअत सातारेवाल्याची ते बाजाय बुजरगत आम्हास आहेत न घेतल्यास सिलसिला बिरादरीचा जो प्राचीनपासून चालता आला तो कता होईल. ऐसियास खिलअत घेण्यास कांही आयब नाही. सारांश साहेबमजकुरास पाहिजे तितकें समजाविले परंतु त्यांनी खिआलात न आणून आले नाही. लाचार, वस्त्रे घेऊन ज़रबक्त मामूल वास्तेशकून खुषीच्या सकरदऱ्याचे बागांत गेलो व पाच रोज तेथेच मुक्काम झाला. जे दिवसी आम्ही बागमजकूरचे तर्फेस रवाना झालो ते दिवसी जंकिन साहेवांनी कर्नेल इस्काटसाहेब मय दोन पलटणे आपले जवळ बोलावून आमचे हवेलीचे बराबरीने सीताबर्डीवर तोफ कायम करून मुस्तैद झाले. जेव्हा हें वर्तमान ऐकण्यांत आले तेव्हा सांगोन पाठविले जे हे गोष्ट मुनासब नाही.

ईश्वर न करो की उभयता सरकारचे दरम्यान मुकालिफत जाहीर हो. खुष रहे आयेन फिसादीस एखत्यार न करता मानी दस्तुराबमौजिब दोस्ती बहाल ठेवावी व तोफ सिताबर्डीवरून खाली आणाव्यात. हरचंद्र मिनत व स्थानत आम्ही बजावून आणली परंतु फायदा दिननुर (?) न झाला. ऐसियास आपले माणुस इज्जतीचा पास बाजीब. सबब आपलीहि फोज सीताबर्डीचे आसपास उतरविली. या उपरांतिक साहेब मजकूर अजीज होऊन नारायण पंडित साहु गुमास्ता भय्याराम गोपालदास बनारसीवाले याचे विद्यमाने सांगोन पाठविले जे आपण फौज आमचे चौतर्फ उतरविली याचे कारण काय जबाब देण्यांत आला जे पहिले प्रत्येक वेळे आहद तहनाम्याच्या बरखिलाफ तुम्हाकडोन गोष्ट सादर जाली परंतु आम्ही आपले कुंपनी सरकारचे फियाबैन जुदाईत साक्ष न करिता दोस्ती सरकार मकसुहची निहायेत मरगुब खातर ठेवीत आहोत. आता आमचेच इज्जतीवर नजर ठेवली आहे हे जाणोन अलबत्ता पास हुरमतीची जरूर. सबब फौज उतरविली व फिसाद रफा होण्याकरिता नारायणजी नाईक नागरे वकील आपलेकडोन साहेब मजकुराचे वकिलाचे हमरार पाठविला जेव्हेळेस उभयता वकील साहेबमजकुराजवळ पोहचून हकिकत जाहीर केली तेव्हा दोघास आपले जवळ बसवोन जबावसवाल दरमियान ऐसा आणिला जे गुजाबादादास इलाहाबादेवरून बोलावून देतो व किल्लाहि खालीं करून देतो व कप्तान बेलीसाहेब वगैरे तेहि मवसुफ. या बोलण्यांत सायंकाळचा समय जाला. कर्नेल इस्काट साहेबानी शुरु (बात) तोफा मारण्याचा केला. तेवेळेस पहिले तिकडोन मुकद्मा लढाईचा आगाज झाला. लाचार. इकडीलहि फौज मुस्तैद झाली. तमाम शावता एक... प्रहर दिवस हरदो तरफेनी जंग कायम राहिला. त्यांत सिदबीसाहेब मय दोन साहेब व दुसरे कामास आले व आमचे फौजेतील दोन सरदार एक जगुजी घोरपडे व अजमखान मारले गेले. व कर्नेल इस्काटसाहेबाचे शिपायांतून सातशे लोकापावेतो बाकी राहिलें व लढाईच्या असबाबापैकी शिवाय एकेक काडतुसाचे एकाजवळहि राहिले नाही. ततकियांत जंकिन साहेबानी नारायणपंडितास विकालतीत पाठविले जे आम्ही सरकार कुंपनीचे तर्फेनी वकिलीचे कामी आहो. वकिलास मारणे ऐसा इतिफाक कोठेहि पडला नाही. तेव्हा आम्हास मारणें ज्यायज न ठेवावे. ही गोष्ट ऐकताच लढाई तोफ मारणे मवकूफ करविले आणि जबाब सांगोन पाठविला ही गोष्ट आम्हास पहिलेपासोन हा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेळेंपावेतो मंजूर नाही की सरकार मवसुफासी जंग करावा बलके सरकार कंपनीस आपले शिरावर बुजरुग वशिला जाणोन दोस्ती या सरकारची......जाणतो परंतु जेव्हा निहायत ज्याजती तुम्हाकडोन जाहीर झाली तेव्हा आम्हीहि या लायक कामास एखत्यार केले. साहेब मस्तुरानी लिहिले मैं वकील हरदी आम्हाजवळ रवाना केले. जे कांही हकिकत उभयताचे दरमियान जाहिरित आली आहे हे अवघी दिलांतून दूर करावी व जंग फियाद याचा खियाल नजरेपासून नाचीन करीन वमोजिब तहनामा कौलकरार दोस्ती उभयता सरकारची बरकरार करावी व फिसाद दूर होण्याकरिता जो माणूस तुम्हाजवळ दायेमूल फिसाद आहे त्यास सजा द्यावी व जो कोणी आमचेजवळ फितने इंग्रज असेल त्याजला आम्ही तंबी करु. वमोजिब लिहिले साहेब मजकुराचे व पास दोस्ती सरकार मवसुफाचे के हमेशा आपले तवियतीस मतवुखा जाणतो फौज आपली त्या जाग्यावरुन उठवून जाय मुक्कामी रवाना केली परंतु साहेबमजकुरांनी नवेजुने कौलकराराास कानी करून तोफा ज्या जागी होत्या तेथून हालचल न करिता मोर्चे कायम ठेविले व सांगोन पाठविले जे मनभट पुरोहित व नारो सखाराम हे उभयता फितेने इंग्रेज आहेत त्यास कैद करावें. त्या बमोजिन आम्ही कैद केले व ज्या शकसाकरिता आम्ही सांगोन पाठविले त्यांनी हरगिज तकलिफ न दिली. इतकियावरहि आम्ही गई करोन खामोष राहिलो. जेव्हा जर्नेल दप-टीन साहेब बहादूर वऱ्हाडांतून मैंफीज नागपूरचे कस्तानी येऊं लागले तेंव्हा आमची फौज जागजागी मारणाचे बंदोवस्ताकरिता राहत होती. तेंवेळेस जंकिन साहेवानी अर्ज केला जे आमचे लढाईचा अखबार वऱ्हाड वगैरे प्रांतांत पोहचल्यावरून साहेब बहादूर वगैरे उभयता सरकारचे सफाईकरिता आपण आपले फौजेस हुकुम द्यावा की घाट...... साहेब येथें पोह-चल्यानंतर बमोजिन दस्तुर साबिक मुलाकत करून व खिलअत वक्षून रुकसंत करावी. नजर या गोष्टीवर जे आम्हास सरकार मकसुहचे दोस्तीपरता मुतसव्वर कांहीच नाही सबब फौज आपली हरयेक मकाणावरोन उठोन त्यास वाट दिली. जर्नेल साहेब पोहचल्यावर जंकिन साहेवानी मसलत ऐसी केली की शहरांत डाका पाडावा. गुंडोपंत विनायकराव व जमालसाहेब मुनसी-साहेवमजकुराकडील यांनी आम्हास खुदिया इतल्ला केला. हे तिघे शक्स साहेब मजकुराचे कामात वाकिफ-गार होते सबब त्यांचे सांगणे सई समजोन कवायिलें आपले भंडाऱ्याचे किल्ल्यांत रवाना केंले व शहराचे निगादास्तीस फौज मुकरर केली. तेवेळी जंकिनसाहेबी पैगाम पाठविली की काय सबब कवियले येथून रवाना केले, जवाब देण्यांत आला जे अव्वलपासोन ताहाल-पर्यंत खिलाफकौलकलम तुम्हाकडोन सादर झालें म्हणोन आपले इज्जतीचे बचावाकरता खटला बाहेर पाठविला परंतु आताहि ज्या तौराने दोस्ती सरकार-कुंपनीची राहे ते आम्हास मंजूर आहे तुम्ही कौलकरार-कदिम दोस्तीचा तत्वीर करून बहुतावर्षाचे मोहवतीचा शिराणा बेवफाईचे कैंचीने त्राशावा. सल्लाह हे आहे की दंगा फिसादीचा दिलांतून दूर करून येनागतीचा शिलसिला हजवून (?) कदिम कायम ठेवावा..

जुगार

क्षण बहरुन मधुरजनी चंदेरी सरली
अधरावरती अधुरी जैजयवंती विरली
आता तव नयनीं कां उगिच निळें स्वप्न तरे ?
उधळुन सर्वस्व जुगारीं हृदयें जर हरलीं !

—उ. रा. गिरी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘प्रवाह’ अन् ‘इशारा’

द. रा. गोमकाळे

विद्यमान मराठी वाङ्मयाचें युग प्रामुख्याने कथा वाङ्मयांच्या उत्कर्षाचें आहे. म्हणून १९५४ सालच्या सुरुवातीला प्रा. मा. का. देशपांडे यांची प्रसिद्ध झालेली “प्रवाह” व गेल्याच महिन्यांत प्रसिद्ध झालेली श्री. ना. सी. फडके यांची “इशारा” या दोन कादंबऱ्या विचारांत घेऊन या वाङ्मयांत अलिकडे विशेषत्वाने आढळणाऱ्या विशिष्ट प्रवृत्तीचा आपल्याला प्रामुख्याने विचार करावयाचा आहे.

मराठी भाषेच्या दरबारांत “दौलत” उधळणारे महाराष्ट्राचे “जादुगार” असा फडक्यांसंबंधी गौरवपूर्ण उल्लेख काळकर्ते परांजपे यांनीं केला होता व त्या उल्लेखाची यथार्थता मराठी कादंबरीच्या वाचकाला सहजासहजीं अमान्य करता येणार नाही. श्री. देशपांडे हेहि फडके, अत्रे, खांडेकर यांच्या साहित्याचे मार्मिक टीकाकार म्हणून महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. आणि या दोघांचीं कलाविषयक मतें आणि दृष्टिकोन एकमेकांना पूरक अशींच आहेत. दोघांच्याहि या कादंबऱ्यांत प्रवृत्तीच्या दृष्टीने आश्चर्यजनक साम्य आहे, व या कादंबऱ्या सर्व साधारणत: अलिकडे प्रसिद्ध झालेल्या मराठी कादंबऱ्यांचें बऱ्याच प्रमाणांत प्रतिनिधित्व करूं शकतील असें वाटतें.

प्रा. फडके यांनी आपल्या साहित्यसेवेंतील स्मृतींत कांही प्रांजळ खुलासे केले आहेत. ते म्हणतात “कलाकृतींत कांहीतरी आशय असलाच पाहिजे. रसिकांच्या चित्तापर्यंत काहीतरी पोचविण्याची इच्छा कलाकाराला असलीच पाहिजे. माझा कटाक्ष इतकाच की, जें कांही सांगायचं त्याची मांडणी अत्यंत कलात्मक पद्धतीनें केल्यावाचून कलाकृति तयार होऊं शकत नाही. एखाद्या तत्त्वाचा आशय तिच्या द्वारें सांगतां येतो, हें मला मान्य आहे. व माझ्या पूर्वीच्या सर्व कादंबऱ्यांत (‘कलंकशोभा’ पूर्वीच्या) असा कोणता तरी आशय मी अनुस्यूत केलेला होता.” फडक्यांचा हा प्रांजळ खुलासा “कलेसाठी कला” या त्यांच्या आवडत्या घोषवाक्यामुळे सर्व साधारण लोकांच्या मनांत कलेकडें पाहण्याऱ्या फडक्यांच्या दृष्टीसंबंधी जो सकारण वा अकारण गैरसमज प्रसृतच नव्हे, तर निश्चित होऊन बसला आहे, तो दूर करण्यास उपयोगी पाडण्यासारखा आहे.

तत्ववेत्त्याच्या भूमिकेवर उभे राहून ललित साहित्यिकाने मानवी आकृतींना आपल्या लेखणीने वाङ्मयांत रंगविलें तर त्याच्या कृति अमर वाङ्मयाच्या पदवीस पोहोचण्यास फारसा अवधि लागणार नाही असें कलावादी साहित्यशास्त्रज्ञहि प्रतिपादतात असें आढळून येईल. फडक्यांना प्रमाण असलेले अमेरिकन साहित्यशास्त्रज्ञ क्लेटन हॅमिल्टन व रॉबर्ट लिडेल आदि आधुनिक इंग्रजी टीकाकारांचेंहि असेंच मत आहे. जीवनाचें यथार्थ, सखोल दर्शन देणाऱ्यालाच सर्व मोठा लेखक समजतात. जीवनाची व्यापक व विस्तृत अनुभूति आणि त्याला जे सांगावयाचें त्या गोष्टीची गाढ आणि प्रत्यक्षानुभूति या दोन गोष्टी ललित साहित्यिकाला आवश्यक असतात आणि त्यांतूनहि दुसऱ्या गोष्टीमुळेच साहित्यिक लहान अथवा मोठा होऊं शकतो.

ललित साहित्याला क्लेटन हॅमिल्टनने “Life Destilled” असें म्हटलें आहे, तें बरोबर आहे. त्यामुळे ललित साहित्याला नैतिक व अनैतिक बंधनें घालण्याचें कारणच उरत नाही. कारण जीवन या सर्व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रात, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कादंबरीमध्यें कलाविलासाचा हेतु प्रधान असला तरी गोष्टींनी व्याप्त आहे. कलावन्ताची नैसर्गिक तळमळ जीवनांतील कांही अनिर्वचनीय सत्यांच्या शोधासाठी असते. जीवनांतील घटनांची अनुभूति आपल्याला रोज पडते. परंतु त्या घटना कां घडतात याचें कारण कळल्याशिवाय सत्याचा प्रत्यय अंतःकरणाला घडत नाही. प्रत्यक्ष वस्तुस्थिति व सत्य यांत हा फरक आहे. साहित्यांतील सत्य अंतःकरणाला जाणवतें, तें यामुळे. अंतःकरणाचा वेध घेणारीं, भावनांचें उन्नयन करणारीं स्वभावचित्रें उच्च साहित्यांत निसर्गतः वसतातच. तीं चित्रें निसर्गसदृश असलीं तरी कलात्मक असतात. प्रत्यक्ष जीवनांत आढळतात तशीं तीं चित्रें नसतात. यामुळे नीति अनीतीचे प्रश्न कलात्मक सत्यांत भावनांच्या विशुद्धीकरणामुळे राहूंच शकत नाहीत, कलावंत आपली कलावंताची भूमिका सोडून जीवनांत प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टींनाच कलेंतील सत्य म्हणण्याचा अट्टाहास ज्यावेळीं करतो, त्याचवेळीं खऱ्या रसिकाला नीति अनीतीचे प्रश्न बोचतात व त्यांचा प्रतिरोध करण्याची इच्छा होते.

कलेचा अंतिम हेतु किंवा तिचें सामर्थ्य तिच्या बाह्य सजावटींत वसत नाही. ते तिच्या आंतरिक गुणधर्मांतही आहे. पण या दोन गुणांच्या समन्वयानेच खरी कला प्रगट होते. या दोहोंत कोणत्याही एकाला कमी जास्त मानण्याचा अविवेक केला तर कलामूर्ति विद्रूप होते परंतु आज कलेला फक्त कलाकुसरीचेंच स्वरूप उरलें आहे. यथार्थवादाच्या अतिरिक्त भरीस पडल्यामुळे सामान्य जीवनांतील हिडीस प्रसंगाचें यथातथ्य वर्णन व चित्रण हाच कलेचा प्रामाणिकपणा आहे, असा भ्रम निर्माण झाला आहे. या प्रकाराला नवकथाकारांनी मनोविश्लेष-णाच्या विशिष्ट प्रकारच्या शारीरिक भरीस पडून विकृतीलाच कला समजण्याचा प्रघात पडला असून जीवनांतील विकृतीच प्राधान्यानें दाखविणें, सिजमंड फ्रॉइडप्रणीत विकृतीवर आधारित प्रसंगांची भडक चित्रें रंगविणें यांतच खरी कला आहे, असा विलक्षण समज त्यांनी आपल्या मनांत निश्चित करून ठेवला आहे. ही प्रवृत्ति विद्यमान कलाकारांत आज बळावत चाललेली दिसून येते, त्या प्रवृत्तीचीं प्रतीकें म्हणजे ‘प्रवाह’ आणि ‘इशारा’ या दोन कादंबऱ्या होत. जीवनांत जें प्रत्यक्ष दिसतें त्यापेक्षा साहित्यांत आविष्कारित होणारें सत्य शाश्वत असतें, विश्वव्यापी असतें याचा या कादंबरीकारांना विसर पडलेला दिसतो. तें आविष्कारित सत्य व्यक्तिमनाच्या द्वारें प्रगट होत असतें.

कलावंताला तूं अमकेंच लिहिलें पाहिजेस, अमकेंच सांगितलें पाहिजेस हें सांगण्याचा इतरांना अधिकार नसेल. परंतु कलावंत खऱ्या अर्थानें कलावंत असेल तर मानवी मनांतील स्थायी भावभावनांचा आविष्कार करण्यास तो समर्थ ठरला पाहिजे. त्यासाठी सौ. कुसुमावती देशपांडे यांनी सांगितल्याप्रमाणे कलावंताच्या अंगीं ‘उदार व गंभीर मानवता’ असावयास पाहिजे. कला केवळ करमणुकीचें साधन बनली तर तिचें खरें मूल्य नष्ट झालें असें म्हणावयास हरकत नाही. ही गोष्ट फडक्यांना पटली, म्हणूनच कलेच्याद्वारां तत्त्वांचा आशय सांगता येतो असें म्हणावयास ते तयार झाले. कारण त्याशिवाय कलाकृतींतील आविष्कारित सत्य रसिकांच्या अंतःकरणाला पटणेंच शक्य नाही; सौंदर्याची प्रचीतिहि होणें शक्य नाही. त्यासाठी त्याला प्रचारकाप्रमाणे कांही उघड सांगण्याची जरूर नाही. खऱ्या कलाकृतीचा तो आवश्यक परिणाम आहे. दुर्दैवानें खऱ्या कलेला आवश्यक असणारे आंतरिक गुण त्यांच्या अलीकडील कादंबऱ्यांत अपवादानेहि आढळत नाहीत. जें आढळतें ती केवळ तांत्रिक टापटीप—रमणीय सजावट. अलीकडील त्यांच्या कादंबऱ्या पाहिल्या तर ज्या गुणांसाठी कादंबरीकारांचा उदोउदो करावयाचा तेहि गुण "इशारा" कादंबरींतील नायिकेप्रमाणे हिडीस व भ्रष्ट स्वरूप धारण करतांना पाहिले म्हणजे असल्या कलाभ्रष्ट प्रवृत्तीचा विरोध करणें जेथे जेथे ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनी कसून करावा असें आग्रहानें म्हणावेसें वाटतें व पैशाच्या, विलासाच्या मोहानें देहविक्रय करणाऱ्या फडक्यांच्या चित्रेप्रमाणे त्यांनी आपल्या कलेची केविलवाणी स्थिति करून घेऊं नये असें कळकळीनें सांगावेसें वाटतें.

देशपांड्यांच्या "प्रवाह" कादंबरींतील नायिका "सुलभा" व फडक्यांच्या "इशारा" कादंबरींतील चित्रा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोघीहि विवाहित आहेत, सधवा आहेत. वैवाहिक जीवनांत दोघींनाहि आपल्या असमाधानाच्या परिहारासाठी देहविक्रयाचा वेश्या व्यवसाय आचरण्यांत यत्किंचितहि खेद वाटत नाही.

लग्नानंतर पहिल्या रात्रीं देशपांड्याची सुलभा पतीच्या शयनमंदिरांत शिरली तो तिथे "उत्सुक मुद्रेच्या आनंदी तरुणाऐवजी डोकंदुखीनं वैतागलेला एक रोगी बिछान्यावर पडलेला तिच्या नजरेस पडला आणि उंचावलेली रूंद भरदार छाती दिसण्यापेक्षां तिला फिकुटलेली पातळ छाती आढळली." ही सुलभेच्या जीवनांतील समस्या आणि श्रीरामाला पाहतांच मात्र "ज्याला खराखुरा पुरुष म्हणता येईल असा तगडा जवान तिला प्रथमच दिसला." सुलभा देहविक्रयाला तयार झाली त्याचें कारण त्या सुखाची प्राप्ति तिला स्वतःच्या पतिकडून शक्य दिसत नव्हती.

फडक्यांची बिंबा रतिसुखापेक्षा ज्याच्या संपत्तीमुळे आपल्या कोणत्याच चैनींत कमी पडणार नाही अशा कोणत्याहि पुरुषाला आपला देह विकण्यांस तयार होती. त्या सुखापुढे तिला स्वतःच्या आईची, पतीची व अजाण अर्भकांची यत्किंचितहि किंमत नव्हती.

श्री पु. गो. सहस्रबुद्धे यांनी स्वभावलेखनाला 'ललित वाङ्मयाची बोधभाषा' मानली आहे, तें बरोबर आहे. मानवरेखा, प्रतिमालेख व व्यक्तिरेखा असे स्वभावलेखनाचे तीन भाग विवेचनाच्या सोईसाठी त्यांनी पाडले आहेत. या ग्रंथकाराच्या विचारांचा निर्देश करण्याचें कारण त्यांचीं कलाविषयक मतें फडके, देशपांडे यांच्या मताशीं सर्वस्वी जुळणारीं आहेत. त्यामुळे नीतिबाज टीकाकारांची जी भीति देशपांड्यांनी आपल्या प्रस्तावनेंत नमूद केली आहे तो आरोप या मूल्यमापनांत येऊं शकणार नाही. फडक्यांची बिंबा व देशपांड्यांची सुलभा या मानवरेखा आहेत असें कष्टाने कां होईना मानणें भाग आहे. परंतु काल, प्रांत व वर्ग यांचा विचार केला असतां या दोन्हीहि मानवरेखा प्रतिभा लेखनाच्या कसोटीला खास उतरूं शकत नाहीत, त्या महाराष्ट्रीय तर खासच नव्हेत. पाश्चात्यांच्या अनुकरणाने त्यांचा जन्म झाला आहे, असें या दोन्हीं पात्रांकडे बरवर नजरेनें पाहिलें तरी खात्रीपूर्वक कोणालाहि म्हणतां येईल. ललित साहित्यांत उत्कृष्ट व्यक्तिरेखांच्या मूल्यमापनाचे जे सर्वसामान्य निकष आहेत त्या निकषावर या व्यक्तिरेखा घासून पाहिल्या तरी त्या तर्कदुष्ट आणि कलाभ्रष्ट वाटतात.

पुरुषी वेषांत टेनीस खेळावयास जाणारी व 'असलं माझी मिठी न झेपणारं मरतमढं पत्करतंय कोण ?' असें फणकाऱ्याने आपल्या आईला सांगणारी प्रा. देशपांडे यांची अद्यावत कॉलेजकन्यका सुलभा नेहमी आजारी असणाऱ्या, देहाने दुबळा असलेल्या, क्षयाच्या मानवेचा संशय असलेल्या, माणसाशीं एकदम लग्न करावयास तयार होईल ही गोष्ट संभवनीय वाटत नाही आणि अशा पुरुषाशीं तिने डोळे उघडे ठेवून विवाह केला असेल तर तिला असमाधानाचें कारणच नाही. या स्वभावचित्रणाचा विकास व चित्रण सुसंगत व तर्कशुद्ध नाही. तिचे आचार विचार महाराष्ट्रीय तर खासच नाहीत. श्रीरामाच्या प्रथम दर्शनानें तिच्या जीवनांत जो घृणास्पद व बेजबाबदार बदल घडून आलेला आहे तोहि असंभवनीय वाटतो. ४०५ पृष्ठांच्या या कादंबरींत सुलभा श्रीरामाच्या उघडया नागडया भडक प्रसंगांनी २०५ पृष्ठें व्यापलीं आहेत. व शेवटीं त्याने सुलभेला अत्यंत घृणास्पद भाषेंत जें तिच्याबद्दलचें सत्य तिच्या तोंडावर सांगितलें तें दुर्दैवाने सुलभेसारख्या एका विदुषीबद्दल आहे. हें यथार्थतेने प्रत्येक वाचकाला पटेल. आपल्या अनाचारामुळे आपल्या विद्वान सज्जन पतीचा खून घडला त्याबद्दल आपण जबाबदार आहोंत, याची यत्किंचितहि खंत न वाटतां श्रीरामपासून रतिसुखाची निर्लज्ज इच्छा करणारी सुलभा ही निव्वळ कृत्या वाटते. तिच्या आत्महत्येपासून कुणाला दुःख तर खासच वाटत नाही. पण कितीहि झालें तरी ही नायिका एका नवख्या कादंबरीकाराने निर्माण केली आहे.

पण जी स्थिति सुलभेची त्यापेक्षा काकणभर अधिक परिस्थिति फडक्यांच्या बिंबेची आहे. तिचा जन्म एका गरीब सच्चरित पवित्र संस्काराच्या मातापितरांच्या पोटीं झाला आहे. या दोन कादंबऱ्यांत फरक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतकाच आहे की 'इशारा' ही कादंबरी फडक्यांसारख्या नाजुक बारीक कलाकुसुर करणाऱ्या सिद्धहस्त लेखकाने लिहिली असल्यामुळे व्यक्तिचित्रणाचे कांही बारीक नाजुक कलाकुसरीचे दुवे जागोजाग आढळतात. परंतु त्यामुळे बिंबेचें व्यक्तिचित्रण यशस्वी खास झालें नाही. किंबहुना मनोविश्लेषणावर आधारित असलेल्या 'खेळणीं' या कादंबरींत मनुष्याच्या विकारावस्थेंत व्यक्त होणाऱ्या वैषयिक खेळांचें नागडे किळसवाणें वर्णन करून त्यांची तृप्ति न झाल्यामुळेच यांनी आपल्या कलेच्या खऱ्या स्वरूपाबद्दल बिंबेचें उत्तान चित्रण करून समाजाला इशारा तर करून दिला नाही ना असें खास वाटूं लागतें. या चित्रणाला फडक्यांनी आपला कलाकुसरीचा हात मारण्याचा प्रयत्न केला असला तरी. केवळ पैशाच्या विलासप्रियतेच्या लालसेनें एका कोवळ्या अर्भकाची माता, स्त्रीदुर्लभ निर्लज्जतेनें नीळकंठाची भोगदासी बनूं शकेल व वासुदेवनें तिला नीळकंठाच्या मंचकावर लोळत पडलेली समक्ष पाहूनहि जणूं कांही अनुचित असें कांही घडलें नाही अशा निर्ढावलेल्या व निर्लज्ज मनानें "किती दिवसांनी भेटतोयसरे" असें शांतपणें कोणतीहि महाराष्ट्रांतील तरुणी बोलूं शकेल असें वाटत नाही. नवकथेच्या नांवाखाली वैषयिक व देहसुखाचे प्रसंग भडक रीतीनें रंगविल्यानें आपण कलेच्या प्रांतांत फार मोठी विधायक भर घालतों असें आज बहुतांश महाराष्ट्रीय कथाकारांना वाटत असावें असें दिसतें. याच सुमारास प्रसिद्ध झालेली "लीलीचें फूल" ही कादंबरी आमच्या या विधानाची साक्ष देईल.

बिंबेच्या नवऱ्याचें स्वभावचित्रणही असेंच विसंगत आहे. आपल्या बाहेरख्याली पत्नीच्या आचरणाकडे स्थितप्रज्ञ वृत्तीने पाहणारे किती नवरे आज समाजांत आढळतील ? भोगाची व विलासाची लालसा त्याच्या मनांत निसर्गत: नसती तर त्याचा बिंबाशीं विवाहच झाला नसता. बिंबाची आईहि तितकेंच विसंगत आचरण करते. सारांश 'इशारा' व 'प्रवाह' या कादंबऱ्यांतील स्वभावचित्रें म्हणजे दरवेशाच्या हातांतील माकडें वाटतात. या कादंबरीकारांनी जीवनांत जें पाहिलें व गाढतेनें अनुभविलें त्याचा परिणाम त्यांच्या मनावर होत जाऊन भावनेच्या उन्नयनाने त्यांतून त्यांना जें सत्य आढळून आलें त्याचा नैसर्गिक आविष्कार म्हणून सुलभा व बिंबा हीं स्वभावचित्रें या कादंबऱ्यांत उतरलीं असें म्हणण्यापेक्षा एका अनिष्ट अनाचारी प्रवृत्तीच्या आहारीं जाऊन यथार्थवादाच्या भरीस पडून या कादंबरीकारांनी हीं घृणास्पद चित्रें रेखाटलीं असें म्हटलें तर तें चुकीचें होईल काय ? ललित वाङ्मयाची बोधभाषा म्हणून ज्या स्वभावचित्रांना आपण म्हणूं शकूं अशीं हीं स्वभावचित्रें आहेत कां ? या स्वभावचित्रांच्या वाचनानें कोणत्या भावनांचें उन्नयन होतें ? हें फडक्यासारखे जादूगार कादंबरीकार तरी सांगूं शकतील काय ? (ऑल इंडिया रेडियोच्या सौजन्यानें)

इतुक्यांत कधीं कुणी

इतुक्यांत कधी कुणी
येतें आवाज चोरीत
उधळत रीत्या मनीं
कुंदकळ्यांची दौलत ॥१॥

ओल्या पाकळ्यांचे ओठ
शहारत- एवढ्यांत
सांडविती दव-बिंदु
सुकें कांही ओलावीत ॥२॥

कधी, पापण्यांच्या आड
रात्रीं चाहुल लागते
आणि भाव अनोळखी
रात्रभर जागवीते ॥३॥

अशा वेळीं भास होतो
प्रतिध्वनि ऐकल्याचा
खोल कुठे तरी मनीं
उचमळत्या पाण्याचा ! ॥४॥

—श्रीधर शनवारे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

शब्दातीत शब्दरूप करूं कैसें ?

माझ्या मानस कासारीं
तुझ्या भक्तीचें कमळ
गोड सुंदर सोज्ज्वळ
विलसतें

माझ्या हृदयारविंदीं
तुझ्या ध्यानाचा सुगंध
उकलीत भवबंध
दरवळे

माझ्या मानसमंदिरीं
तुझ्या मूर्तीची स्थापना
निरपेक्ष उपासना
चालतसे

माझ्या वाणीच्या वीणेचा
मधु झंकार त्यांतुन
तुझें नामसंकीर्तन
चालतसे

माझ्या विचारप्रवाहीं
शुद्ध तन्मय जीवन
मोह–पहाड फोडून
वाहतसे

माझ्या भक्तीच्या उद्यानीं
फुलें श्रद्धेचीं फुलतीं
ब्रह्मानंदांत डोलतीं
अविरत

माझ्या कर्मयोगक्षेत्रीं
बीज सेवेचें पेरिलें
मळे मोदाचे फुलले
चहूकडे

तुझ्या कृपेचें चांदणें
ये उघळीत प्रकाश
माझें जीवन आकाश
व्यापावया

माझ्या बुद्धीच्या लोचनीं
तुझें निर्गुण स्वरूप
शब्दातीत शब्दरूप
वर्णूं कसें ?

—द. रं जोशी

दुःख....

दुःख माझें विचित्रसें
मीलनाची हाव मनीं
घालूं बघे मन माझें
आकाशाला गवसणी— !

चिमुकुले हात त्याचे
कसे पुरावे नभाला
रवि, शशि आणि तारा
कशा गवसाव्या त्याला— !

कसे समजावूं त्याला
नाहीच तो गाव माझा
भोळ्या खुळ्या माझ्या जीवा
भलताच हट्ट तुझा— !

कधी वितळेल ढग
कधी बरसेल धार
कधी होईल हलका
दुःख भरलेला ऊर— ?

—ना. दि. देशमुख

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्षेमा

कु. पुष्पा कानडे

मद्राधिपतीच्या कन्येचें नांव क्षेमा असें होतें. जन्मतःच तिचें स्वरूप व सुंदर अंगकांति दिसून येत होती. तिच्या सुवर्णमय अंगकान्तीमुळे तिचें नांव क्षेमा असें ठेवलें होतें. ती आपल्या आईबापांची अत्यंत लाडकी होती. हळूहळू शुक्ल पक्षाच्या चंद्राप्रमाणे मोठी झाल्यावर विवाहयोग्य अशा समयीं तिचा विवाह कौशल्येश्वराशीं लावण्यांत आला.

कौशल्येश्वराचेंच दुसरें नांव बिंबिसार असें होतें. हा राजा गौतम बुद्धाचा पहिला श्रावक म्हणजे शिष्य होता. या शिष्यानें गौतम बुद्धाला आपल्या राजधानींतील नितांत रमणीय असें वेळूवन दान केलें होतें आणि त्या वेळूवनांत भगवान बुद्ध आपल्या शिष्यांबरोबर राहत असे. क्षेमेच्या कानावर वेळूवनांत राहत असलेल्या भगवान बुद्धांच्याबद्दल अनेक गोष्टी आल्या होत्या. ती स्वतःला खूपच सुंदर समजत असे. आणि जेव्हा गौतम बुद्ध सौंदर्याची कधीहि स्तुती करीत नाही, उलट सौंदर्यांतील दोष काढणेंच त्यांना अधिक आवडतें असें तिने ऐकलें, तेव्हा सहाजिकच तिचा मनोभंग झाला. अगोदरच ती रूपवती असल्यामुळे गौतमाने आपल्या सौंदर्याची स्तुति करावी असें तिला वाटे. पण गौतमाची मनोभूमिका कोणत्या दर्जाची होती हें ऐहिक सुखांत दंग असलेल्या स्त्रीस समजणें शक्य नव्हतें. इतर अनेक राजे तिच्या सौंदर्याची स्तुति करीत. दरबारचे लोक तिच्या सौंदर्याचे गोडवे गात. आणि इतर अनेक सुंदर स्त्रियांना ती लाजेनें माना खाली घालावयास लावी. असें असतांना आपण भगवान बुद्धाच्या दर्शनास गेलों आणि त्यांनी आपल्या सौंदर्यांतील दोष दाखवुन आपला अपमान केला तर ? या विचाराने ती गौतम बुद्धाच्या दर्शनास जाण्याची टाळाटाळी करीत असे.

तिचा पति बिंबसार हा गौतमबुद्धाचा परम भक्त होता. त्या उलट त्याची पट्टराणी बुद्धाच्या दर्शनासहि न जाणारी. हा विपरीत भाव राजाला बिलकुल आवडला नाही. युक्तिप्रयुक्तीनें तिचा सौंदर्याचा गर्व नाहीसा करून तिच्या मनांत गौतमविषयक भक्ति उत्पन्न केली पाहिजे असें त्याने ठरविलें व त्याला लौकरच एक तोड सापडली.

एके दिवस त्याने भाटांना बोलावून आणलें व अत्यंत उत्तम भाषेंत अरसिक मनुष्यालाहि मोहून टाकणारें वेळूवनाचें अत्यंत मनोहर काव्य रचण्याची आज्ञा केली. या रीतीनें तें काव्य तयार झाल्यानंतर राजानें राणीच्या महालापासून फार दूर नसलेल्या ठिकाणीं भाटांना बसवून तें काव्य गाण्यास सांगितलें. उत्तम रागदारींत गाईलेल्या त्या काव्याचा योग्य तो परिणाम झाला. व त्यामुळे त्या सुंदरीस तें उद्यान (वेळूवन) पाहण्याची तीव्र इच्छा झाली. दुसरेच दिवशीं ती राजाकडे गेली व महाराजांनी उद्यान पाहण्यास जाण्याविषयीं अनुमति द्यावी अशी त्यांस विनंती केली. राजाने सुद्धा हसून अनुमति दिली पण तेथे गेल्यावर भगवान बुद्धाचें दर्शन करून त्यांस प्रणाम केल्याशिवाय मात्र आपणास परत येतां येणार नाही असें सांगितलें. राजाने तिच्या बरोबर असलेल्या सेवकांस असें सांगितलें की, "उद्यान पाहून देवी माघारीं येतांना भगवान बुद्धाच्या दर्शनास गेल्या तर बरेंच, नाही तर मात्र आम्हास अशी राजाज्ञा आहे असें सांगून तिला त्यांचें दर्शन करवाच."

सर्व दिवसभर क्षेमाराणी त्यांच्या उद्यानांत हिंडली व त्यांची शोभा पाहिली. त्या ठिकाणचें हसरें सौंदर्य, वेगवेगळ्या रंगाचे पक्षी, हरिणादि प्राणी आणि सुगंधांनी भरलेला तो प्रदेश पहात पहात तो दिवस केव्हा गेला हें तिला समजलें देखील नाही. अशा रीतीनें तें उपवन पूर्ण पाहिल्यावर तिने सेवकांना परत फिरा असा हुकूम दिला. तथापि राजसेवकांनी राजाज्ञेची जाणीव तिला करून दिली व राणीही चेहऱ्यावर कांहीहि विकार न दाखवितां त्यांच्या मागोमाग जावयास निघाली. थोड्याच वेळांत ती भगवान बुद्धाच्या वसतिस्थानापाशीं येऊन पोचली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भगवान बुद्धानें ती राणी आपणाकडेंच येत आहे असें पाहून आपल्या सामर्थ्यानें एक स्वर्गीय सौंदर्याची पुतळी निर्माण करून ती हातांत पंखा घेऊन भगवानाला वारा घालीत आहे असें दृश्य निर्माण केलें. क्षेमाराणी तेथें जाऊन पाहते तों आपल्यापेक्षाहि सुंदर स्त्री भगवानाला वारा घालीत आहे. हें पाहून ती जागच्या जागींच थिजली व एकसारखी तिच्याकडे पाहूं लागली. आश्चर्याचा एक क्षण गेल्यावर तिच्या विचारांत एकदम बदल झाला. आणि तिचीं इंद्रियें अंतर्मुख झालीं. इतक्या सुंदर स्त्रिया भगवान बुद्धाजवळ राहूं शकतात. मी तर हिची वटीकसुद्धा शोभणार नाही ? मनांत पापी विचारांना थारा दिल्यामुळे मीं आपला केवढा घात करून घेतला आहे असें तिला वाटूं लागलें आणि अशा रीतीनें समाधिमग्न होऊन एकतानतेने बुद्धाजवळील सुंदर स्त्रीकडे पाहात असतांनाच मघाशीं वारा घालीत असलेल्या त्या स्त्रीची प्रथम दशा हळूहळू बदलत जाऊन तिचें तें मुसमुसलेलें सौंदर्य कमी होऊन तिने मध्यमावस्थेंत प्रवेश केला, असें राणीस दिसलें. थोड्याच वेळांत तिने तीस वार्धक्यांत प्रवेश करतांना पाहिलें. तिचें तें सौंदर्य नाहीसें झालें होतें. तिची अंगकांति निघून गेली होती. तिचे ते भ्रमरासही लाजविणारे काळे केस पांढरे झाले होते. गात्रें विकल झालीं. बांधेसूदपणा जाऊन त्या ठिकाणीं शैथिल्य व वक्रताहि आली होती, दात पडले होते, सर्व शरीर सुरकुतलेलें दिसावयाला लागलें व राणीकडे पाहतां पाहतांच ती आपल्या हातांतील पंख्यासह मृत होऊन पडली.

हें दृश्य पाहिल्यावर राणीच्या मनांत एकदम प्रकाश पडला व तिच्या विचारांत क्रांति व्हावयास लागली. इतका वेळ जी अज्ञानाने भरलेली होती तिच्या समोर ज्ञानरवीचा उदय झाला. "माझें हें शरीर याच गतीस जाणार काय ?" असा विचार मनांत उत्पन्न झाला. व त्यांतूनच तिला आत्मज्ञानाची प्राप्ति झाली. आणि मागील जन्माच्या संस्कारावर जे एक दडपण या जन्मीं पडलें होतें तें भगवान बुद्धाच्या या दर्शनाने पार उडून गेलें. व पूर्वजन्मीच्या पुण्यसंस्काराचें प्राबल्य झालें. अशा रीतीने या मानिनीचें अंतःकरण शुद्ध होत असतांना बुद्धाने पुढील अर्थाची गाथा म्हटली.

"स्वतः तयार केलेल्या जाळ्यांत सापडणाऱ्या माकडाप्रमाणे ऐहिक सुखास भूलून त्यास चिकटलेले लोक जन्ममरणाच्या प्रवाहांत पडतात. पण अनपेक्षी लोक त्या प्रवाहाचा छेद करून प्रव्रजित म्हणजे ज्ञानवान होतात व कामसुखाचा नाश करतात."

अशा अर्थाची गाथा ऐकतांच उभी असतांनाच क्षेमाराणीस पटसांभियाशास्त्राचा पूर्ण साक्षात्कार झाला, आणि निर्वाण पदाच्या मार्गावरील जे टप्पे आहेत त्यांतील शेवटची पायरी म्हणजे अर्हपद प्राप्त झालें. बौद्ध तत्वज्ञानाच्या समजुतीप्रमाणें असा नियम आहे की संसारांत राहून हें पद प्राप्त झालेल्या मनुष्याचें त्या दिवशीच निर्वाण झालें पाहिजे. किंवा त्याने संन्यास दीक्षा तरी घेतली पाहिजे. आपलें आयुष्य अजून संपले नाही हें जाणून क्षेमाराणी संन्यास घेण्याविषयी आपल्या पतीची अनुमती मिळविण्यासाठी बुद्धाला वंदन करून नगराकडे वळली. राजवाड्यांत जाऊन ती राजाच्या समोर त्यास वंदन न करतां तशीच उभी राहिली.

एकंदर तिच्या चर्येवरून ती अर्हपदास पोचली असली पाहिजे असा राजाने तर्क केला व "देवी खरच कां आपण भगवान बुद्धाच्या दर्शनास गेलां होतां? असें त्याने तिला विचारलें. परंतु आपणापेक्षा मीं भगवानाचें दर्शन अधिक पूर्णपणे घेतलें असून त्यांना आपणापेक्षा पूर्णपणें जाणलें असल्यामुळे महाराज आपण मला संन्यास घेण्यास परवानगी द्या." असें ती गंभीरपणें म्हणाली.

आता मात्र ही राजाच्या परीक्षेची वेळ होती. पण राजाने नुसतेंच "देवी, फार चांगले !" म्हणून संमति दिली व एका सुवर्णशिबिकेंत तिला बसवून तिची रवानगी भिक्षुणी संघाच्या निवासस्थानाकडे करून दिली. तेथे तिला रीतसर प्रव्रजा म्हणजे संन्यासदीक्षा मिळाली.

एक दिवस भगवान बुद्ध जेतवनांत बसला असतांना भिक्षुणी संघ जमला होता. व त्यांच्यांत निरनिराळ्या भिक्षुणीस निरनिराळें स्थान देत असतांना क्षेमा स्थविरा म्हणजे महाप्रज्ञावती म्हणून तिची त्यानें अग्रभागीं स्थापना केली. आणि अशा तऱ्हेने जन्मजन्मांतरींची तिची उत्कट इच्छा पूर्ण झाली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ल. वि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. १७–७–५९ रोजीं सकाळीं ९ वाजतां, संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली केंद्रीय कार्यालयांत भरली.

(१) प्रथम सरचिटणीसांनी दि. १–५–५९ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

त्यानंतर चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीचें कार्यवृत्त, दि. ७–७–५९ च्या कार्यकारी मंडळाच्या नागपुरांतील सभासदांच्या अनौपचारिक सभेचें वृत्त आणि हिशेब, सरचिटणिसांनी सभेला सादर केले. ते मंजूर झाले.

(२) गोंदिया शाखेच्या दि. १–५–५९ च्या पत्राचा विचार करण्यांत आला. ह्यावर साधक बाधक चर्चा होऊन गोंदिया शाखेची तूर्त निकड व मागणी लक्षांत घेऊन गोंदिया शाखेला दैनंदिन कार्यांतर्गत कार्यक्रमांकरिता रु. दोनशें मदत म्हणून देण्यांत यावेत व तीनशें रुपये इतर शाखांना आवश्यकता भासल्यास व मागणी आल्यास मदत देतां यावी ह्या हेतूने राखून ठेवण्यांत यावेत असें ठरलें. तसेंच केंद्रीय मंदिराच्या कामाकडे लक्ष देतां कोणत्याहि शाखेला मंदिरनिर्माण कार्यासाठी मदत देणें शक्य होणार नाही असें सर्वानुमतें ठरलें.

(३) श्री. म. ग. दीक्षित यांचा खालील ठराव विचारार्थ सभेपुढे आला :

ठराव— "विदर्भ साहित्य संघानें मध्यप्रदेश सरकारकडून लखनौ कमिटीची नागरी–लिपि–योजनेची एक प्रत मागवावी व त्या योजनेचें परीक्षण करण्याकरिता एक समिति नेमावी."

ठरावांत दिल्याप्रमाणे वरील योजनेची एक प्रत मागविण्यांत यावी व ती आल्यावर एक उपसमिति नियुक्त करण्यांत यावी असें ठरलें.

(४) विदर्भ साहित्य संघाच्या येत्या १८ व्या वार्षिक अधिवेशनाच्या प्रश्नाचा विचार करण्यांत आला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(५) विदर्भ साहित्य संघाच्या समित्या, उपसमित्यांच्या बाहेरगावच्या सदस्यांना ते सभांना उपस्थित राहिल्यास तिसऱ्या वर्गाच्या रेल्वे भाड्याच्या रकमेइतका प्रवासभत्ता त्यांना देण्यांत यावा असें सर्वानुमतें ठरलें. तसेंच स्थानिक सदस्यांना कोणत्याहि प्रकारचा वाहनखर्च दिला जाऊं नये असें एकमताने ठरविण्यांत आलें. मात्र अध्यक्षांनी यापूर्वीच मंजूर केलेला स्थानिक सभासदांचा वाहनखर्च मान्य केला गेला.

(६) पुस्तकालय समितीचा अहवाल संमत होऊन त्यानुसार पुस्तकालयाची योजना कार्यान्वित करण्यांत यावी आणि गडकरी–स्मारक–समितीचें नियोजित ग्रंथालय सुरू झाल्यावर संघाचें ग्रंथालय गडकरी स्मारक समितीच्या ग्रंथालयाकडे सोपविण्यांत यावें असें ठरलें.

(७) अमरावती शाखेच्या पुनरुज्जीवनाबाबत प्रा. मा. ल. व्यवहारे यांनी आपल्या अडचणी निवेदन केल्या. त्यांनी मागणी केल्यावरून 'प्राथमिक खर्चासाठी अमरावती शाखेच्या चालू वर्षाच्या सभासद संख्येच्या हिशेबाने होणाऱ्या अंशदानाच्या रकमेपैकी पन्नास टक्के रक्कम तावडतोब त्यांना देण्यांत यावी असें ठरलें.

(८) संघशाखांनी पुढील कार्यक्रम प्रतिवर्षी अवश्य साजरे करावेत असें सर्वानुमतें ठरलें : (१) आगरकर स्मृतिदिन (२) टिळक पुण्यतिथि (३) ज्ञानेश्वर पुण्यतिथि (४) कोल्हटकर स्मृतिदिन (५) केळकर स्मृतिदिन (६) गडकरी स्मृतिदिन (७) चिपळूणकर स्मृतिदिन (८) खाडीलकर स्मृतिदिन (९) सर्व दिवंगत साहित्यिकांचा संयुक्त स्मृतिदिन व (१०) शाखेचा वार्षिकोत्सव.

त्यानंतर सभेचा कार्यक्रम संपला.

*　*

सांस्कृतिक कार्यक्रम :

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे खालील कार्यक्रम झाले :

(१) दि. ३० जून १९५९ रोजीं सुप्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ डॉ. सुनीतिकुमार चातर्जी यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली.

(२) दि. १ जुलै १९५९ रोजीं डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली डॉ. वा. ना. पंडित यांचें "मराठी वाङ्मयावर भागवत संप्रदायाचा परिणाम" या विषयावर विद्वत्तापूर्ण व्याख्यान झालें.

(३) दि. ६ जुलै १९५९ रोजीं संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांनी 'भगवान श्रीवेदव्यास यांचें कार्य' या विषयावर गुरुपौर्णिमेनिमित्त व्याख्यान दिलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(४) दि. २६ जुलै १९५५ रोजीं संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. दे. गो. लांडगे यांचें 'नागपूरकर भोंसले वंशाचें ऐतिहासिक मूल्य' या विषयावर भाषण झालें.

*   *

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिति, नागपूर

ऑगस्ट ५५ परीक्षा-समयपत्र

२० ऑगष्ट ५५ शनिवारीं दुपारीं २॥ ते ५॥	साहित्य स्नातक १
२१ ऑगष्ट ५५ रविवारीं सकाळीं ७॥ ते १०॥	स्नातक २, परिचित १ विनीत, प्रारंभ व प्रवेश
२१ ऑगष्ट ५५ रविवारीं दुपारीं २॥ ते ५॥	स्नातक १; परिचित २

केंद्राधिकाऱ्यांना सूचना

(१) उत्तरपत्रिका आणि प्रश्नपत्रिका दि. १० ऑगष्ट ५५ ते १५ ऑगष्ट ५५ पर्यंत केव्हांहि येतील. तरी आलेलें सर्व साहित्य ताबडतोब तपासून पोच द्यावी व उणीव कळवावी.

(२) सर्व लिहिलेल्या उत्तरपत्रिका २१ ऑगष्ट रोजीं पोस्टांत पडल्याच पाहिजेत व **रजिस्टर्ड पोस्टची** त्या तारखेची पोंच कार्यालयास मिळाली पाहिजे. अन्यथा केंद्रखर्चांत कपात केली जाईल.

(३) ज्या केंद्रांत 'मौखिक प्रवेश' आहे, तेथील केंद्राधिकाऱ्यांनी स्थानिक मौखिक परीक्षक नियुक्ति १५ ऑगष्टच्या आंत करून कार्यालयास सूचित करावी.

परीक्षार्थींना सूचना

(१) आपआपलीं आवेदनपत्रें परीक्षार्थीनें स्वतः आपल्या केंद्रांत जाऊन घेतलीं पाहिजेत. तसेंच समयपत्रकहि टिपून घेतलें पाहिजे.

(२) अपरिहार्य कारणास्तव अनुपस्थिति संभव असल्यास केंद्राधिकाऱ्यामार्फत कार्यालयास ताबडतोब सूचित करावें.

(प्रा.) पां. कृ. सावळापूरकर (संचालक)   (प्रा.) माणिक के. बैतुले (कार्यवाह)

कै. बापूजी दप्तरी स्मृति
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugwani) Regd. No. N 945

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंवी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना बिनामूल्य. * सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका